महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक २२.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

ना. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २२.०९.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण. |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| ३. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. मु. अ. नकवी | मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मा. मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ७. | श्री. विजय देवरुखकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. अशोक भुताड | मा. कामगार प्रतिनिधी |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदयांचे व सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीत चर्चा करावयाच्या विषय शी संबंधित कागदपत्रांचा संच सर्व उपस्थितांना वाटप करण्यात आला. बैठकीच्या विषयांस सुरुवात करण्यापूर्वी मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या समवेत संपन्न बैठकीतील ठरावांवर काय कार्यवाही करण्यात आली, मा. पंतप्रधान कार्यालयाकडून मंडळास आलेल्या सुचना तसेच सुप्रिम कोर्टाच्या सुचना याकडे सर्व उपस्थितांचे लक्ष वेधले. तसेच सदर ठरावांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळाकडून सादर करण्यात यावा, अशा सुचना दिल्या.

यावर मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दिनांक २८.०६.२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार मंडळाकडून केलेल्या व करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दिनांक २३.०८.२०१७ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासनास सादर केलेल्या प्रस्ताबाबत पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.. मा. पंतप्रधान यांचे कार्यालयाकडून खालील मुद्यांवर कार्यवाहीबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत.

- राज्यों के पास Construction Workers Welfare Fund के अंतर्गत कुल मिलाकर ३० हजार करोड रुपये है। हमे इसके उचित उपयोग पर ध्यान देना चाहिए।
- अभी हाल में में गाईडलाइन जारी की गई है। Unorganized Worker के लिए
    - ट्रांसिट एकोमोडेशन
    - Mobile toilet (स्वच्छता के लिए अत्यंत आवश्यक)

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

- Mobile crèche
- Mobile dispensary
- बच्चों के पढाई के लिए स्कॉलरशिप
- बीमारी के समय इलाज के लिए सहायता आदि की व्यवस्था जैसे काम करना उचित होगा।

➢ एक राज्य (केरल) ने इस पैसे से पेंशन देना शुरू कर दी है। अब हालत यह होने वाली है की कॉर्पस खत्म हो जाएगा और पेंशन का भार राज्य सरकार पर आ जाएगा। इस चीज से बचना चाहिए।

या संदर्भात मंडळ सचिव यांनी सादर केले की, उपरोक्त सुचनांपैकी बांधकाम कामगारांच्या मुलांकरीता शिष्यवृत्ती, बांधकाम कामगारांच्या आजारपणा वरील उपचाराकरीता विविध योजना मंडळामार्फत पुर्वीपासुन राबविण्यात येत आहेत. मोबाईल क्रेच (Mobile Creche) च्या धर्तीवर मोबाईल-डे- केअर युनिट स्थापन करणेबाबत मंडळाने दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत निर्णय घेतलेला आहे. शासन स्तरावरून दिनांक १२.०९.२०१७ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्राप्त झालेली आहे व आजच्या बैठकीत RFP Document चे सादरीकरण करण्यात येणार आहे. याशिवाय ट्रांसिट एकोमोडेशन, Mobile toilet व Mobile dispensary या संदर्भात कार्यवाही करणे अपेक्षित आहे. मा. प्रधानमंत्री महोदयांच्या उपरोक्त सुचनांना अनुसरून केलेल्या कार्यवाहीबाबत तसेच करावयाच्या कार्यवाहीबाबची माहिती मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या कार्यालयातील मा. अपर मुख्य सचिव यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहे. मा. अप्पर मुख्य सचिव यांचे स्तरावरून दिनांक १५.०९.२०१७ रोजी आढावा बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत वरीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे. सदर बैठकीस मा. प्रधान सचिव (कामगार) व मंडळाचे सचिव उपस्थित होते.

४३ वी बैठक दिनांक २२.०९.२०१७

अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

मा. सर्वोच्च न्यायालयाने बांधकाम कामगारांच्या नोंदणी वाढविणे व उपकर निधी खर्च् करणेबाबत वारंवार निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मंडळाच्या विविध बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मंडळ स्तरावरून व आवश्यक तेथे राज्य शासनाच्या मान्यतेने कार्यवाही करण्यात येत आहे. राज्यातील अन्य विभागातील अधिकाऱ्यांना नोंदणी अधिकारी घोषित करणे, कामगार संघटनांचे नोंदणी व लाभ वाटपाकरीता मदत/ सहाय्य घेणे, मनरेगा योजनेअंतर्गत कार्यरत बांधकाम कामगारांची नोंदणी करणे, तालुका स्तरावर कॅम्प चे आयोजन करणे, नोंदणीकृत मजूर सोसयटीच्या सभासदापैकी बांधकाम कामाची संबंधित कामगारांची नोंदणी करणे, उपकर निधी खर्च करण्यासाठी यापुर्वी मंजूर योजनांना प्रसिद्धी देणे व नवीन योजना राबविण्याबाबत कार्यवाही करणे अशा विविधि उपाययोजना करण्यात येत आहेत.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## बैठकीचे इतिवृतांत

| अ.क्र. | विषय | घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.** | मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत मंडळ सचिव यांनी वाचुन दाखविले व बैठकीच्या ठरावावरील केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल मंडळास अवगत केला. सदर इतिवृत्तात काही बदल करावयाचे असल्यास त्यासह इतिवृत्त कायम करणे प्रस्तावित आहे, असे मंडळ सचिव म्हणाले. त्यावर मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी विषय क्र. ४ च्या ठरावावर बोलताना असे स्पष्ट केले की, प्रत्येक जिल्हयात |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | कॅम्प आयोजित करताना त्या त्या जिल्ह्यातील मंडळ सदस्यांना प्रमुख पाहूने म्हणून निमंत्रित करण्यात यावे. तसेच, मंडळ सदस्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करावे, असे सुचित केले. त्यास उपस्थित मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली. त्यानुसार करावयाच्या कार्यवाहीच्या सुचना संबंधिताना देण्यात येतील, अशी मंडळ सचिव यांनी ग्वाही दिली.<br>मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| २. | **नोंदित बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविण्यासाठी मंडळाचे** | याबाबत बोलताना मंडळ सचिव मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र राज्यात नोंदीत बांधकाम कामगारांपैकी मोठया प्रमाणावर बांधकाम कामगार अन्य राज्यातून स्थलांतरीत झालेले आहेत. तसेच ग्रामीण भागातूनही बरेच बांधकाम कामगार रोजगार मिळण्यासाठी शहरात येतात. सदर बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी निवासाची पुरेशी व्यवस्था नसते. तसेच, स्वयंपाक करणेही जिकरीचे ठरते. परिणामी आरोग्याचे व कुपोषणाचे प्रमाण दिसून येते व त्याचा परिणाम बांधकाम कामकाजावरही होतो. याबाबत विचार विनिमय करून दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **Consultant मे. KPMG यांनी तयार केलेल्या RFP Document चे सादरीकरण व त्यास मंजूरी देणे.** | "बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे," व दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत "नोंदित बांधकाम कामगारांसाठी प्रस्तावित मध्यान्ह भोजन योजना राबविण्यास मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सदर योजना प्रथम टप्प्यात विभागीय स्तरावर राबविण्यात यावी. व सदर योजना राबविण्यासाठी विभागनिहाय अनुभवी स्वयंसेवी संस्था/ महिला बचत गट/ अन्य संस्थेची नेमणूक ई-निविदा पद्धतीने करावी, योजना अंमलबजावणीच्या देखरेखीसाठी कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांचे विभागनिहाय पाहणी पथकाची नेमणूक करावी. सदर योजनेस शासन मान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात यावी" असे ठराव पारित करण्यात आले.<br><br>त्यानुसार मंडळाच्या दि.२२.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास अनुसरून शासन स्तरावरून काही मुद्यांची माहिती सादर करणेबाबत मंडळास कळविण्यात आले होते.<br><br>मंडळाकडून उपरोक्त मुद्यांच्या पूर्ततेसह RFP डॉक्युमेंटस तयार करणेबाबत मे. केपीएमजी यांना कळविण्यात आले. त्यानुसार मे. केपीएमजी यांनी तयार केलेले RFP डॉक्युमेंटस चे सादरीकरण मा. मंत्री |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दि.०७.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत करण्यात आले होते. सदर बैठकीस मंडळाचे मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव (कामगार) व मा. कामगार आयुक्त उपस्थित होते. सदर बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार RFP डॉक्युमेंटस मध्ये योग्य तो बदल करण्यात आला. व त्याबाबतची नोंद बैठकीच्या इतिवृत्तांत घेण्यात आली आहे.<br>मंडळमार्फत शासनास सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावास अनुसरून शासनाने दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मान्यता केलेली आहे. सदर मान्यता प्रदान करताना "योजना राबविताना लाभार्थींचे निकष, पात्रता, मूल्य व इतर सर्वसमावेशक बाबींचा अंतर्भाव करून योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने या संदर्भात प्राप्त मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश, केंद्र शासनाच्या प्राप्त विविध सूचना, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/ परिपत्रके, इमारत व इतर बांधकाम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील विविध तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याची खबरदारी घ्यावी. " असे नमूद केले आहे.<br>मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दि.०७.०९.२०१७ रोजीची बैठकीमधील सूचना व शासनाच्या दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या उपरोक्त निर्देशातील निविदेशी संबंधित अटी शर्तीस अनुसरून मे. केपीएमजी यांनी सदर योजनेचे RFP Documents तयार करणेबाबत सुचित केले होते, त्यानुसार RFP Documents सादरीकरण मंडळाच्या बैठकीत करण्यात येत आहे. |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाच्या मान्यतेअंती प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस सादर करून योजनेच्या अटी शर्तीसह शासन मान्यता प्राप्त करून मंडळामार्फत निविदा प्रक्रिया राबवावी असे प्रस्तावित आहे.<br>तद्नंतर मंडळाचे E-Goverance मे. KPMG च्या प्रतिनिधींनी मध्यान्ह भोजन योजनेबाबतच्या RFP Document चे सादरीकरण केले. सदर सादरीकरणाची हार्ड कॉपी सर्व मंडळ सदस्यांना देण्यात यावी, असे मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मे. KPMG चे प्रतिनिधींना सुचना दिल्या व मंडळ सदस्यांनी सदर RFP Document मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मंडळाला आठ दिवसात कळवावे. त्यानुसार सदर RFP Document मध्ये योग्य तो बदल मे. KPMG यांचे मार्फत करण्यात यावा, असेही सूचित केले. तसेच, प्रत्येक योजना राबविताना नोंदणीकरीता वेगळी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी, असेही सुचविले. त्यास मे. KPMG च्या प्रतिनिधींनी सहमती दर्शविली.<br>याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना प्रायोगीक तत्वावर मुंबई, MMR क्षेत्रात (लक्षांक-१०,००० प्रतिदिन), पुणे (लक्षांक-१०,००० प्रतिदिन), व नागपूर (लक्षांक-५,००० प्रतिदिन), या तीन ठीकाणी राबवावी. यासाठी मंडळाचे Consultant मे. KPMG यांनी सादरीकरण केलेल्या RFP Document ची प्रत ई-मेल द्वारे सर्व मंडळ सदस्यांना पाठवावी. मंडळ** |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | **सदस्यांनी सदर RFP Document मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मंडळाला आठ दिवसात कळवावे. मंडळ सदस्यांनी सुचविलेल्या बदलासह प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ३. | **नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी प्रायोगिक तत्वावर मोबाईल डे केअर युनिट स्थापन करण्यासाठी मंडळाचे Consultant मे. KPMG यांनी तयार केलेल्या RFP** | याबाबत बोलताना मंडळाचे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी मोबाईल डे-केअर युनिट (Mobile day Care) सुविधा उपलब्ध करून देणेबाबतच्या योजनेस मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता देण्यात आलेली आहे<br>**ठराव :-** नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी मोबाईल डे-केअर युनिट (Mobile Day-Care Unit) सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावित योजनेस मान्यता देण्यात आली. बांधकामाच्या ठिकाणी कार्यरत अन्य राज्यातील नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांशी त्यांच्या मातृभाषेत संवाद साधण्यात यावा व प्रस्तावित योजनेस शासन मान्यता प्राप्त करून योजनेच्या कार्यान्वयनासाठी ई-निविदा पद्धतीने अनुभवी स्वयंसेवी संस्था/ अन्य अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.<br>राज्यातील विविध बांधकामाच्या ठिकाणी काम करणा-या बांधकाम कामगार हे विविध राज्यातून |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **Document चे सादरीकरण व मंजूरीबाबत** | स्थलांतरीत झालेले आहेत किंवा ग्रामीण भागातून कामानिमित्त बांधकामाच्या ठिकाणी आलेले असतात. सदर कामगार कामाच्या कालावधीत आपल्या कुटूंबासह/पाल्यासह बांधकामाच्या ठिकाणी राहतात. स्त्री व पुरूष बांधकाम कामगार कामावर असताना त्यांच्या पाल्यांकरीता लक्ष देण्यास अन्य व्यक्ती उपलब्ध नसल्याने पाल्यांकडे दुर्लक्ष होते. बांधकाम कामगारांची मुले बांधकाम कामगारांच्या वेळोवेळीच्या स्थलांतरणामुळे नियमित शालेय शिक्षण घेऊ शकत नाही, त्यांच्या वैयक्तिक स्वछतेकडेही पालक लक्ष देत नाही. परिणामी, सदर पाल्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामाच्या ठिकाणी मोबाईल डॅ-केअर युनिट स्थापन केल्यास बांधकाम कामगाराच्या पाल्यांसाठी पाळणाघर, बालवाडी, पाल्यांना शाळेत जाण्यास मदत करणे, आरोग्यांची काळजी घेणे, पाल्यांचा संभाळ करणे, पाल्यांचा अभ्यास करून घेणे, पाल्यांना पोषण आहार देणे, शाळेतून गळती झालेल्या मुलांना शाळेत रूजू करणे, स्वच्छतेची काळजी इ. सुविधा मोबाईल डे-केअर युनिटमार्फत उपलब्ध करून देण्याच्या उददेशाने मंडळाने पारित केलेल्या ठरावास अनुसरून विहीत नमुन्यात योजना मंजूरीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.<br>त्यानुसार मंडळाच्या दि. २१.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास अनुसरून शासनाच्या दि. २०.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये काही मुद्यांची माहिती सादर करणेबाबत मंडळास कळविण्यात आले होते. त्यानुसार मंडळाच्या दि.२१.०८.२०१७ |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| | रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविण्यात आले आहे.<br>मंडळाकडून उपरोक्त मुद्यांच्या पूर्ततेसह RFP डॉक्युमेंटस तयार करणेबाबत मे. केपीएमजी यांना कळविण्यात आले त्यानुसार मे. केपीएमजी यांनी तयार केलेले RFP डॉक्युमेंटस चे सादरीकरण मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दि.०७.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत करण्यात आले होते. सदर बैठकीस मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मा. प्रधान सचिव (कामगार) व मा. कामगार आयुक्त उपस्थित होते. सदर बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार RFP डॉक्युमेंटस मध्ये योग्य तो बदल करण्यात आला व त्याबाबतची नोंद सदर बैठकीच्या इतिवृत्तांत घेण्यात आली आहे.<br>मंडळमार्फत शासनास सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावास अनुसरून शासनाने दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्रदान केलेली आहे. सदर मान्यता प्रदान करताना योजना राबविताना लाभार्थींचे निकष, पात्रता, मूल्य व इतर सर्वसमावेशक बाबींचा अंतर्भाव करून योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने या संदर्भात प्राप्त मा. सर्वोच्च् न्यायालयाचे आदेश, केंद्र शासनाच्या प्राप्त विविध सूचना, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/ परिपत्रके, इमारत व इतर बांधकाम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील विविध तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याची खबरदारी घ्यावी." असे नमूद केले आहे. |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दि.०७.०९.२०१७ रोजीची बैठकीमधील सूचना व शासनाच्या दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या उपरोक्त निर्देशातील निविदेशी संबंधित अटी शर्तीस अनुसरून मे. केपीएमजी यांनी सदर योजनेचे RFP Documents तयार करणेबाबत सुचित केले होते त्यानुसार RFP Documents सादरीकरण मंडळाच्या बैठकीत करण्यात येत आहे.<br>मंडळाच्या मान्यतेअंती प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस सादर करून योजनेच्या अटी शर्तीसह शासन मान्यता प्राप्त करून मंडळामार्फत निविदा प्रक्रिया राबवावी असे प्रस्तावित आहे.<br>तद्नंतर मंडळाचे E-Goverance मे. KPMG च्या प्रतिनिधींनी मोबाईल डे केअर युनिट स्थापन करण्यासाठी RFP Document चे सादरीकरण केले. सदर सादरीकरणाची हार्ड कॉपी सर्व मंडळ सदस्यांना देण्यात यावी, असे मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मे. KPMG चे प्रतिनिधींना सुचना दिल्या व मंडळ सदस्यांनी सदर RFP Document मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मे. KPMG यांना आठ दिवसात कळवावे. त्यानुसार सदर RFP मध्ये बदल करण्यात यावे, असेही सूचित केले. तसेच, सदर योजना राबविताना नोंदणीकरीता वेगळी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी व पाल्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोबाईल-डे-केअर युनिट मध्ये CCTV बसविण्यात यावे, असेही सुचविले. त्यास मे. KPMG च्या प्रतिनिधींनी सहमती दर्शविली. |



अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी किमान ३० पाल्य उपलब्ध होवू शकतील अशा बांधकामाच्या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर ५० ठिकाणी मोबाईल डे केअर युनिट स्थापना करण्यात यावी. सदर योजना सुरुवातीस मुंबई, MMR क्षेत्रात, पुणे व नागपूर या तीन ठीकाणी राबवावी. यासाठी मंडळाचे Consultant मे. KPMG यांनी सादरीकरण केलेल्या RFP Document ची प्रत ई-मेल द्वारे सर्व मंडळ सदस्यांना पाठवावी. मंडळ सदस्यांनी सदर RFP Document मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मंडळाला आठ दिवसात कळवावे. तसेच पाल्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोबाईल-डे- केअर युनिट मध्ये CCTV बसविण्यात यावे व मंडळ सदस्यांनी सुचविलेल्या बदलासह प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ४. | **नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सोयीसाठी सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविणेबाबत** | याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) केंद्रीय नियम १९९८ मधील नियम क्र. ४२, ४६, ५४ व ९२ नूसार व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७ मधील नियम क्र. ६१ ते ८१ नूसार बांधकाम कामगारास सुरक्षासंच (उदा. हेल्मेट, जॅकेट, सेफ्टी बेल्ट, शूज, ग्लोब्ज् इ.) पुरविणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे कंत्राटदाराने बांधकाम कामगारांना सुरक्षा संच उपलब्ध करुन दिला पाहिजे. याकरिता मंडळाच्या अधिकाऱ्यांनी |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | बांधकामाच्या जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली पाहिजे व त्यात त्रूटी आढळल्यास, संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याची तरतूद अधिनियमात आहे.<br><br>मंडळाच्या दि.२४.१०.२०१६ रोजी व दि.०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पुरविणेबाबत विषय सादर करण्यात आला होता व चर्चेअंती सुरक्षा संच पुरविण्याबाबत मंडळ सदस्यांनी इतर राज्यामध्ये करण्यात आलेल्या कारवाई सादर केल्यानंतर मंडळाच्या पुढील बैठकीत सदर विषय चर्चेला घेण्यात यावा असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.<br><br>या संदर्भात इतर राज्याची माहिती घेतली असता सुरक्षा संच पुरविणेबाबतची योजना ओडीसा राज्यात राबविण्यात येत असल्याचे दिसून येते. ओडिसा राज्यामार्फत सुरक्षा संचाच्या खरेदीकरीता बांधकाम कामगारास रू.१०००/- इतके अर्थसहाय्य दिले जाते.<br><br>या संदर्भात मे. टेलेस्टो कॉमेंट प्रा.लि. यांच्या दि.०६.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रधान सचिव (कामगार) यांना बांधकाम कामगारांसाठी सुरक्षा संच पुरवठयाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे.<br><br>उपरोक्त प्रस्तावात खालील सुरक्षा विषयक बाबींचा समावेश आहे.<br><br>1. Protective Shoes<br>2. Respiratory Protection |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

3. Heraing Protection
4. Safety helmet
5. Safety Harness
6. Reflactive Jacket
7. Safety Goggle

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मंडळाच्या दि.१३.०९.२०१७ च्या पत्रान्वये संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांना अभिप्राय देणेबाबत विनंती करण्यात आली होती. संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०१७ च्या पत्रान्वये सदर प्रस्तावातील सुरक्षा साधनांच्या तांत्रिक बाबी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा विचारात घेवून प्रस्तावातील अनुक्रमणिके प्रमाणे खालील सुरक्षा साधने बांधकाम कामगारांना पुरविणे संदर्भात अभिप्राय नमूद केले आहेत.

| अ.क्र. | सुरक्षा साधने | प्रस्तावातील अनुक्रमांक |
|---|---|---|
| 1. | Protective Shoes (Safety Shoes) | ०१ |
| 2. | Dust Mass (Respiratory Protection) | ०५ |
| 3. | Heraing Protection (Ear Plug) | ०७ |
| 4. | Safety helmet | १३ |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| 5. | Safety Handgloves | १६ |
| 6. | Safety Harness | १७ |
| 7. | Reflactive Jacket | १९ |

वरील सुरक्षा साधनाशिवाय पुरूष व महिला कामगारांना घट्ट आवरणाचे कपडे दिल्यास बांधकामाच्या जागेवर काम करताना सुरक्षिततेच्या दृष्टीने मदत होईल असे अभिप्राय उपरोक्त दि.१९.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेले आहे. मे. टेलेस्टो कॉमेंट प्रा.लि. या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावात एका संचाची अंदाजित रक्कम रू. ५०००/- (पॅकिंगसह) + वस्तू सेवा कर असून मंडळाकडील ३.१० लक्ष नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या विचारात घेता वस्तू सेवा करासह अंदाजित रू.१६० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय नव्याने नोंदणी होणाऱ्या बांधकाम कामगारांना नोंदणीच्यावेळी सुरक्षा संच देणे प्रस्तावित आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६ चे कलम २२ मध्ये मंडळाने करावयाची कार्ये नमूद केले आहे. त्यातील कलम २२ (ह) नुसार बांधकाम कामगारांसाठी अन्य कल्याणकारी योजना राबविण्याची तसेच सदर कल्याणकारी योजना सुधारित करण्याची तरतूद आहे.

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेअंती उपरोक्त तपशीलासह योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात येईल. शासन मान्यतेनंतर ई-



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | निविदा पध्दतीने अनुभवी संस्थेची नियुक्ती करून पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.<br>त्यावर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७ मधील नियम क्र. ६१ ते ८१ नूसार बांधकाम कामगारास सुरक्षासंच (उदा. हेल्मेट, जॅकेट, सेफ्टी बेल्ट, शूज, ग्लोब्ज् इ.) पुरविणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे कंत्राटदाराने बांधकाम कामगारांना सुरक्षा संच उपलब्ध करुन दिला पाहिजे, अशी तरतूद आहे. त्यामुळे मंडळाने सुरक्षा संच खरेदी करणे योग्य वाटत नाही. मंडळाकडून सुरक्षा संच (सेफ्टी किट) कामगारांना पुरवठा न झाल्यास परिणामी एखाद्या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याचीं जबाबदारी मंडळावर येईल. सबब, याबाबत पुर्नविचार करावा, असे मत मा. कामगार आयुक्त यांनी व्यक्त केले.<br>त्यावर मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी असे स्पष्ट केले की, जरी अधिनियमाच्या तरतूदीमध्ये कंत्रादाराकडून सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविण्यात यावी असे नमुद असले तरी, कंत्राटदार कामगारांना सुरक्षा संच (सेफ्टी किट) चा पुरवठा करत नाहीत. त्यामुळे मंडळाकडून कामगारांच्या सुरक्षततेच्या दृष्टीने सुरक्षा संच (सेफ्टी किट) देण्यात यावी. मा. अध्यक्ष यांचे मतास मा. कामगार प्रतिनिधी श्री. भुताड यांनी दुजोरा दिला.<br>त्यावर मा. मंत्री महादेय (कामगार) यांनी मंडळामार्फत कामगारांना सुरक्षा संच (सेफ्टी किट) देण्यास काहीही हरकत नाही, असे मत व्यक्त केले. |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सुरक्षततेसाठी सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविण्यात यावे, सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरवठ्याकरीता संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०१७ च्या पत्रान्वये सुरक्षा साधनांच्या तांत्रिक बाबी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा विचारात घेवून प्रस्तावातील केलेली सुरक्षा साधने बांधकाम कामगारांना पुरविण्यात यावे. तसेच सुरक्षा संच पुरवठयासाठी ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करावी. त्याकरीता आवश्यक RFP Document मंडळाचे e-Goverance Consultant मे. KPMG यांच्या कडून तयार करून घेण्यात यावे व योजनेच्या अटी शर्ती, अंदाजित खर्च व त्यानुसार तयार केलेले RFP Document शासन मान्यतेस सादर करावे. शासन मान्यतेनुसार पूढील कार्यवाही करावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ५. | **नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांसाठी Essentional Kit** | याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, शासनाकडून मंडळातील बांधकाम कामगारांना Essential Kit पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे. इमारत व इतर बांधकाम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ४० व ६२ अन्वये राज्य शासन मंडळास योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत आदेश देऊ शकते. |

**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **पुरविणेबाबत.** | महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय दि.०५.१२.२०१६ अन्वये शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या ४४ वस्तू व नियोजन विभागाचे शासन निर्णय दि.०३.०३.२०१७ अन्वये समावेश करण्यात आलेल्या १८ वस्तू कोणत्याही योजनेंतर्गत खरेदी करून लाभार्थ्यांना वाटप/ वितरित करता येणार नाहीत. नियोजन विभागाच्या दि.०५.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयात जर कल्याणकारी योजनेंतर्गत कोणतीही वस्तू/ साधनसामुग्री लाभार्थ्यांना द्यावयाचे असल्यास त्यांनी अनुसवायाच्या कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.<br>या संदर्भात मे. टेलेस्टो कॉमेंट प्रा.लि. यांच्या दि.०६.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रधान सचिव (कामगार) यांना बांधकाम कामगारांसाठी सुरक्षा संच पुरवठयाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे.<br>सदर प्रस्तावानुसार बांधकाम कामगारांच्या दैनंदिन वापराकरीता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे. सदर साहित्याच्या संचामध्ये खालील वस्तू पुरविणे प्रस्तावित आहे.<br>१. प्लॅस्टिक मॅट – १ नग<br>२. मॉस्क्युटो नेट- १ नग<br>३. सोलर टॉर्च- १ नग |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ४. टिफीन बॉक्स- १ नग<br>५. वॉटर बॉटल- १ नग<br>६. आऊटर बॅग- १ नग<br>७. गमबूट- १ जोडी<br>८. गॅल्वानाईझ्ड ट्रंक – १ नग<br>उपरोक्त वस्तूंचा संच पुरवठयासाठी प्रतिसंच रू.५५००+ वस्तू सेवा कर प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.मंडळातील ३.१० लक्ष बांधकाम कामगारांची संख्या विचारात घेता सदर वस्तू संच पुरवठयाचा अंदाजित खर्च रू.१७५ कोटी राहील.<br>महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या दि.०५.१२.२०१६ व दि.०३.०५.२०१७ मधील DBT द्वारे लाभार्थ्यांच्या खाती रोख स्वरूपात थेट रक्कम जमा करण्याच्या साधनसामुग्रीच्या यादीत उपरोक्त वस्तूंचा समावेश नाही. त्यामुळे सदर वस्तू ई-निविदा पध्दतीने खरेदी करून नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करणे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर योजना मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. शासन मान्यतेनंतर ई-निविदा पध्दतीने अनुभवी संस्थेची नियुक्ती करून पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे सुचित केले की, सन २०१४ मध्ये नोंदणीकृत बांधकाम कामगारांना द्यावयाच्या भेटवस्तू ऐवजी रोख रक्कम रु. ३०००/- देणेबाबत निर्णय घेण्यात आला होता. त्याच धर्तीवर मंडळामार्फत Essentional Kit खरेदी करून देण्याऐवजी Essentional Kit च्या किमतीएवढी रक्कम DBT पद्धतीने कामगारांच्या खात्यात जमा करण्यात यावी. तसेच सुरक्षा संचामध्ये Protective Shoes देण्यात येत असल्यामुळे Essentional Kit मध्ये गम बूट घेतल्याने पुनरावृत्ती झाल्याचे दिसून येते. त्यावर मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की, मंडळाने बांधकाम कामगारांच्या बँक खात्यात निधी वर्ग केल्यानंतर बांधकाम कामगाराकडून Essentional Kit खरेदी करण्यात येईल, याची खात्री नाही यास्तव मंडळाकडून किट खरेदी करून देणे योग्य राहिल. यासंदर्भात मा. अध्यक्ष यांनी अशीही विचारणा केली की, DBT च्या शासन आदेशाच्या बाबीत सदर बाबींचा समावेश आहे किंवा कसे? यासंदर्भात खुलासा करताना मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय दि.०५.१२.२०१६ अन्वये शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या ४४ वस्तू व नियोजन विभागाचे शासन निर्णय दि.०३.०३.२०१७ अन्वये समावेश करण्यात आलेल्या १८ वस्तू कोणत्याही योजनेंतर्गत खरेदी करून लाभार्थ्यांना वाटप/ वितरित करता येणार नाहीत असे शासन आदेश आहेत. सदर दोन्ही यादीत Essentional Kit मधील वस्तूंचा समावेश नाही. यावर मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी सहमती दर्शवून नोंदित |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | बांधकाम कामगारांकरीता Essentional Kit मंडळामार्फत खरेदी करून उपलब्ध करून देणे योग्य राहिल, असे मत व्यक्त केले.<br>त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या उपयोगासाठी प्रस्तावित Essentional Kit पुरविण्यात यावे, सदर कीटमध्ये गमबूट- १ जोडी ही बाब वगळण्यात यावी.Essentional Kit पुरवठ्याच्या अटी व शर्ती निश्चित कराव्यात. Essentional Kit पुरवठयासाठी ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करावी. त्याकरीता आवश्यक RFP Document मंडळाचे E-Goverance Consultant मे. KPMG या कडून तयार करून घेण्यात यावे व योजनेच्या अटी शर्ती, अंदाजित खर्च व त्यानुसार तयार केलेले RFP Document शासन मान्यतेस सादर करावे. शासन मान्यतेनुसार पूढील कार्यवाही करावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ६. | **मंडळाच्या विविधि कल्याणकारी योजनांबाबत प्रसार/ प्रसिद्धी करण्यासाठी** | याबाबत मंडळ सचिव असे सुचित केले की, मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मा. कामगार आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ६० अंतर्गत केंद्र शासनाने त्यांच्या दि. ०७.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने जाहीराती न करण्यासंदर्भात जारी केलेले आदेश मंडळास पाठविले आहेत. मा. सर्वोच्च |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | १० कोटीचा प्रस्ताव. | न्यायालयाने पारीत केलेले आदेश मा. कामगार आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना वाचुन दाखविले.<br>"......We make it clear that the expenditure incurred by some of the State Government/Union Territories, particularly NCT of Delhi on advertisements with the amount collected is not at all appropriate and the amount that has been spent by the NCT of Delhi and other Union Territories/and States on Advertisement should be returned to the accounts of the construction workers....."<br>याबाबत मा. अध्यक्ष यांनी मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनेची जनजागृती अभावी बांधकाम कामगारांना माहितीच मिळाली नाही तर नोंदणी वाढणार कशी, असा मुद्दा मा.अध्यक्ष यांनी उपस्थित केला.<br>यावर मंडळाच्या उपसचिव श्रीमती स्वेता सिंघल यांनी जाहिरातीवर खर्च करु नये, असे मा. न्यायालयाचे आदेश असल्याची बाब सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली. मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणे व विविध कल्याणकारी योजनांचा लाभ कामगारांपर्यंत पोहाचविण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध न करता जनजागृती मोहिम राबवावी त्याकरीता जनजागृती सप्ताह आयोजित करावा असे ठरले व चर्चेअंती "मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांसाठी जनजागृती मोहिम राबविणेबाबत ठराव पारित |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

करण्यात आला. मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा जनजागृती सप्ताह आयोजित करून त्यामध्ये मुख्यालय स्तरावर एक मोठा इन्व्हेंट (Event) आयोजित करावा. तसेच प्रत्येक जिल्हा कार्यालय स्तरावर एक कार्यक्रम आयोजित करावा. सदर इन्व्हेंट व राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनेची विविध प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात यावी. तसेच रेडिओ जिंगल्स, एस.टी. बसेस, बेस्ट बसेस व एस.टी. स्टँड वर होर्डींग्ज लावणे, फिरत्या वाहनांद्वारे मंडळाच्या योजनांची जनजागृती करणे, तसेच बांधकामाच्या ठिकाणी व कामगारांच्या नाक्यावर मंडळाच्या योजनांचे मोठे फ्लेक्स लावणे, मंडळाच्या योजनांबाबतचे पुस्तक वाटप करणे, इ. मार्फत मंडळाच्या योजनांची जनजागृती करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला आहे."

उक्त ठरावाच्या अनुषंगाने राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु, सदर प्रस्तावास राज्य शासनामार्फत मान्यता अद्याप अप्राप्त असल्यामुळे बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभ वाढविण्याकरीता योजनांचा प्रसार खालील नमूद माध्यमांद्वारे करून जनजागृती करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | तपशील | कालावधी | अपेक्षित खर्च (कोटी) |
|---|---|---|---|
| १. | रेडिओ- FM Broadcast in | 3 relays 5 days | ०.८० |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| | Maharashtra | | |
| २. | महाराष्ट्रातील वर्तमानपत्र (1 insert of 400 SQ. CM) | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, ०१ मे विभागनिहाय | १.०२ |
| ३. | बेस्ट बसेसद्वारे जनजागृती | १ महिना (मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मिरा भायंदर) | २.६७ |
| ४. | एस.टी. (MSRTC) बसेस द्वारे जनजागृती | १ महिना १५०० बसेस (३४ जिल्हे) | ४.४३ |
| ५. | होर्डिंग्ज | राज्यातील ७५ ठिकाणी, (जिल्हे, तालुके) १ महिन्याकरीता | ०.७४ |
| ६. | सहयाद्री दूरदर्शन | 02 relays 05 important days | ०.३४ |
| | एकूण | | १०.०० |

उपरोक्त जनजागरण मोहीम राबविण्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीची आवश्यकता राहील तसेच यांनतरही मंडळास वेळोवेळी करावयाच्या प्रसिध्दीसाठी अशा संस्थाची गरज भासणार आहे ही बाब विचारात घेऊन जाहिरात क्षेत्रातील नामांकित संस्थांकडून प्रस्ताव मागवावे व सदर संस्थांपैकी १० संस्थांना मंडळाच्या पॅनेलवर नियुक्त करून सदर पॅनेलवरील संस्थामार्फत वरीलप्रमाणे प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात यावे, असे प्रस्तावित आहे.

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | सदर संस्थांना पॅनलवर नियुक्त करण्याचा कालावधी ०२ वर्षे असावा व आवश्यकतेनुसार ०१ वर्षासाठी मुदतवाढ देण्याची तरतूद ठेवण्यात येईल.<br>मंडळस्तरावर नियुक्त करावयाच्या जाहिरात संस्थांच्या पॅनेलकरीता वर्तमानपत्रात जाहीर प्रसिध्दीद्वारे निविदा मागवून पॅनल तयार करणे व सदर पॅनलवरील संस्थामार्फत प्रथम टप्प्यात वरील तपशीला प्रमाणे जनजागरण मोहीम राबविणे व त्यावरील अपेक्षित खर्च व रु.१० कोटीच्या खर्चाचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.<br>यावर मा.कामगार प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी मागील जनजागृतीच्या ठरावाबाबत विचारणा केली. त्यावर मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, शासनाचे पत्र दिनांक १५.०९.२०१७ अन्वये कामगार विभागातील विविध योजनांच्या जनजागृतीसाठी त्या क्षेत्रात काम करणाऱ्या एजन्सीचे Empanelment करावे, तसेच जनजागृतीचा एकत्रित वार्षिक आराखडा सादर करावा असे असे निर्देश दिले आहेत.<br>मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, शासनाच्या निर्देशानुसार १० संस्थांचे पॅनल तयार करून प्रथम टप्पात प्रस्तावित केल्याप्रमाणे रु. १० कोटीच्या प्रसिद्धीची कार्यवाही करण्यात येईल, प्रथम टप्पात करावयाच्या प्रसिद्धीच्या तपशिलासह अंदाजित अपेक्षित खर्च रु. १० कोटीचा प्रस्ताव मंडळासमोर सादर करण्यात आलेला आहे. मंडळाच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेस पाठविण्यात येईल, त्यावर शासन |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | योग्य तो निर्णय घेईल, असेही सर्व उपस्थितांना अवगत केले.<br>यावर मंडळाने यापूर्वी शासन मान्यतेस पाठविलेल्या प्रस्तावास अद्याप मान्यता प्राप्त झाली नाही याबाबत मंडळाचे मा. अध्यक्ष व सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे पॅनल तयार करावे व रु. १० कोटीचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा असेही यांनी स्पष्ट केले<br>मा. संचालक (लेखा व कोषागारे) श्री. नकवी यांनी मंडळ स्तरावर पॅनल तयार करण्यास व प्रथम टप्प्यात रु. १० कोटीच्या प्रसिद्धीच्या प्रस्तावास मान्यता देण्यास सहमती दर्शविली.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती मोहीम राबविण्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीची आवश्यकता आहे. मंडळास यांनतरही वेळोवेळी करावयाच्या प्रसिध्दीसाठी अशा संस्थाची गरज भासणार आहे. यास्तव माहिती व जनसंपर्क विभागामार्फत दर्शनी जाहिराती तयार करणे, वितरीत करणे, मोहिम आखणे व अंमलबजावणीचे कामाबाबत निश्चित कार्यपद्धतीची माहिती प्राप्त् करावी व त्यानुसार कार्यवाही करावी. माहिती व जनसंपर्क विभागाने निश्चित केलेल्या पॅनेलवरील संस्थामार्फत प्रथम टप्प्यात प्रस्तावित रु. १० कोटी व भविष्यातील विविध माध्यमाद्वारे करावयाच्या प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शासन निर्देशानुसार जनजागृतीचा एकत्रित** |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | **वार्षिक आराखडा तयार करून शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ७. | **गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तवित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगारआवास योजना" या योजनेच्या अंमलबजावणीबाबत मंडळाचे अभिप्राय शासनास सादर करणे** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, देशातील सर्व बेघरांना पक्की घरे उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यातआलेली आहे. शासन निर्णय गृहनिर्माण विभाग दि.०९.१२.२०१५ अन्वये सदर योजना नागरी समूहांत खालील ०४ घटकांतर्गत राबविण्यात येते.<br>१. जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपटटयांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे. (ISSR)<br>२. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (CLSS)<br>३. खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (AHP)<br>४. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यासाठी अनुदान (BLC)<br>उपरोक्त घटक क्र.०१ साठी केंद्र व राज्य सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रू.१.०० लक्ष इतके असून घटक क्र.०३ व ०४ साठी केंद्र सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रू.१.५० लक्ष इतके तर राज्य शासनाचे अनुदान घटक क्र.०१,०३ व ०४ करीता प्रती लाभार्थी रू.१.०० लक्ष इतके आहे. निरनिराळया घटकांतर्गत कर्ज संलग्न अनुदान वगळता केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाचा हिस्सा ४० टक्के, ४० टक्के आणि २० टक्के अशा ०३ |



(स्वाक्षरी)

अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| | हप्त्यात मुक्त करण्यात येणार आहे. तर घटक क्र.०२ साठी विवक्षित बँका/ गृहनिर्माण वित्तीय कंपन्या व इतर संस्था त्यांच्याकडून १५ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.<br>प्रधानमंत्री आवास योजना ही राज्यामध्ये प्रभावीपणे राबविता यावी यासाठी राज्य शासनाकडून खालील सवलती देण्यात आलेल्या आहेत.<br>१. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या मंजूर गृहनिर्माण प्रकल्पांसाठी अंमलबजावणी यंत्रणा (म्हाडा, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर शासकीय व निमशासकीय संस्था) यांना आवश्यक असलेली आणि निर्बाध्यरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन संबंधित जिल्हाधिकारी यांनी रू.१/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने कब्जेहक्काची किंमत वसूल करून संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेस भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रदान/ हस्तांतरीत करावयाची आहे.<br>२. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घटक क्र.०१, ०३ व ०४ खालील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पास मोजणी शुल्कामध्ये ५० % इतकी सवलत देण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी दि.०३.०८.२०१६ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

३. योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना/ लाभार्थींना वाटप करण्यात येणाऱ्या ३० चौ.मी. क्षेत्राच्या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात आली असून रू.१०००/- इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

४. प्रधानमंत्री आवस योजनेतील प्रकल्पांना विकास शुल्कातून सूट (नपा/मनपा अधिनियम मध्ये नगरविकास विभागाकडे सुधारणा प्रस्तावित) देण्याबाबत मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झालेली आहे.

➢ **प्रंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्पांना खालील सवलती देण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.**

१. प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रकल्पांना २.५ इतके चटई क्षेत्रफळ निर्देशांक (FSI) अनुज्ञेय करण्याची विनंती नगरविकास विभागास करण्यात आलेली आहे.

२. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून (CLSS) बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पांना मोजणी शुल्क तसेच मुद्रांक शुल्कातून सूट देण्याची विनंती महसूल व वन विभागास करण्यात येत आहे.

➢ **महाकामगार आवास योजना**

या योजनेनुसार एखाद्या शहरात १० पेक्षा अधिक कामगार कार्यरत असलेल्या बांधकाम विकासकास अशा सर्व कामगारांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे बांधून देणे बंधनकारक असले. यासाठी एकापेक्षा अधिक विकासक एकत्र येवून सदरची योजना राबवू शकतील. योजनेंतर्गत बांधण्यात येणारी घरकुले पंतप्रधान



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | आवास योजनेच्या कर्ज संलग्न व्याज अनुदान (CLSS) या घटकाच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावयाची असून सदर घरकुले MHADA, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ आणि संबंधित विकासक यांच्यामध्ये होणाऱ्या संयुक्त भागीदारी करारानुसार बांधण्यात येतील.<br>त्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाकामगार आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांकरीता परवडणारी घरे निर्माण करण्याच्या धोरणास मंत्री मंडळाची मान्यता घेण्याची बाब गृहनिर्माण विभागाकडून प्रस्तावित आहे.<br>➢ सदर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता असेल.<br>➢ सदर योजनेंतर्गत घरकुलांची निर्मिती करण्यासाठी व्याज अनुदान वगळता खर्चाचा ८०% भार मंडळ उचलणार असून २० % कर्जाची प्रतिपूर्ती लाभार्थ्यांकडून करण्यात येणार आहे.<br>➢ त्या अनुषंगाने मान्यता/ अभिप्राय देण्याची विनंती कामगार विभागास करण्यात आलेली आहे.<br>उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०९.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर मुद्याबाबत मंडळाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार मंडळाचे अभिप्रायासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत बांधकाम कामांराच्या घराकरीता मंडळाने मंजूर केलेल्या योजनांना शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे काय अशी विचारणा मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी केली.<br>याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाड्याची घरे देणे, म्हाडाकडील तयार घरे खरेदी करणे, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्ग पात्र बांधकाम कामगारांना राज्य शासनाकडून द्यायवयाचे अर्थसहाय्य रु. १ लक्ष राज्य शासनाऐवजी मंडळाकडून देणेबाबत शासन मान्यतेस प्रस्ताव सादर केलेला आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दिनांक २८.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत म्हाडाकडून घर खरेदी करणे या प्रस्तावास असहमती दर्शवून नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडयाची घरे उपलब्ध करून देण्यासाठी सचिव स्तरीय समिती गठीत करणे व प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांना केंद्र शासनाकडील रु. १.५० लक्ष व राज्य शासनाचे रु. १ लक्ष याशिवाय मंडळाकडून रु. १ लक्ष एवढे अनुदान देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला.<br>याबाबत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचित केले की, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांना केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाशिवाय मंडळाकडून रु. १ लक्ष ऐवजी रु. २ लक्ष अर्थसहाय्य देण्यासही हरकत नाही.<br>गृहनिर्माण विभागाकडून बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | "महाकामगारआवास योजना" च्या अटी शर्ती, घरांची किंमत, मंडळाचा व लाभार्थ्यांचा हिस्सा, दरमहा अदा करावयाचा हफ्ता या विविध मुद्यांवर मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. नोंदित बांधकाम कामगाराने दरवर्षी कमीत कमी ९० दिवस काम करण्याची अट पुर्ण न केल्यास सदर कामगाराची नोंदणी संपुष्टात येते. अशा सर्व बाबींवर विचारविनिमय करण्यात आला.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तावित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगारआवास योजना" ऐवजी मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांच्या घराकरीता मंजूर केलेल्या विविध ठरावानुसार सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करावी. तसेच मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या ठरावात बदल करून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांकरीता केंद्रशासन व राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान रु. २.५ लक्ष शिवाय मंडळाकडून रु.२ लक्ष अनुदान देण्यात यावे. तसा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ८. | **नोंदित बांधकाम कामगारांच्या** | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना त्यांनी घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| **घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत.** | मंडळामार्फत देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर योजना कर्नाटक, हरियाणा व राजस्थान या राज्यांमध्ये राबविण्यात येत त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे |

| अ.क्र. | कर्नाटक | हरियाणा | राजस्थान |
|---|---|---|---|
| योजनेचे नाव | घरखरेदीबाबत आर्थिक सहाय्य | अधिनियमाच्या नियम ५३ अन्वये घर खरेदी/ घर बांधणे करीता कर्ज | बांधकाम कामगारांकरीता सुलभ गृहनिर्माण योजना |
| योजनेचा तपशील | अ) पात्रता<br>१. बांधकाम कामगारांची नोंदणी कमीत कमी ०५ वर्षे जिवीत असली पाहिजे.<br>२. कामगाराने निवृत्ती वेतन सेवेची १५ वर्षे पूर्ण केलेली असली पाहिजे.<br>३. घर कामगाराच्या किंवा त्याच्या जोडीदाराच्या नावे असणे बंधनकारक | अ) पात्रता<br>१. ०५ वर्षे नोंदणी जिवीत असणे बंधनकारक<br>२. कामगार फक्त एकदाच लाभ घेऊ शकतो.<br>३. सर्व बांधकाम कामगारांना लागू<br>४. कामागराच्या मृत्यू लागू राहणार नाही. | अ) पात्रता<br>१. कामगाराची मागील एक वर्षात नोंदणी झालेली असणे बंधनकारक<br>२. जर घर स्वता:च्या जमिनीवर बांधले असेल तर सदर प्लॉटवर स्वत: किंवा पत्नी/ पती यांची मालकी बंधनकारक<br>३. सदर मालमत्तेवर कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद असू नये. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आहे. | | ४. बँकेकडून / वित्तीय संस्थेकडून कर्जा व्यतिरिक्त स्वत:च्या बचतीचा सहभाग असावा<br>५. बांधकाम जागेचे तसेच आराखडयाचे परवाने महानगरपालिकेकडून मंजूर करून घेणे बंधनकारक<br>६. बांधकामाची जागा कायदेशीर वारसाच्या नावे असणे बंधनकारक.<br>७. कामगाराच्या नावे स्वताचे घर असल्यास तो सदर योजनेत लाभ घेऊ शकणारी नाही.<br>८. सदर घराची पती पत्नीच्या नावे संयुक्त मालकी असावी. |
| | | | ब) लाभ<br>१. सदर योजनेत नोंदीत | ब) लाभ<br>१. ०५ वर्षे नोंदणी जिवीत | ब) लाभ<br>१. केंद्र शासन व राज्य शासनाच्या |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | बांधकाम कामागरांना अर्ज करून लाभ घेता येणे शक्य<br>२. बांधकाम कामगारांच्या नावे घराचे खरेदीखत,मंजूर आराखडा इ. चा तपशील सादर करावा लागेल .<br>३. मंडळामार्फत घर खरेदी, घरबांधकाम व त्यावरील कर्जाच्या प्रस्तावाचे छाननी करण्यात येईल.<br>४. सदर योजनेचा अर्ज नाकारताना अर्जदारास सदर योजनेत राहिलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संधी दिली जाते. | असणे बंधनकारक आणि<br>२. अर्जदाराचे वय कमीत कमी ५२ वर्षापेक्षा जास्त असू नये सदर योजनेचे कर्जाची परतपेड पुढील ०८ वर्षात करता यावी.<br>३. सदर योजनेचा लाभ फक्त एकदाच घेणे शक्य | विविध योजनांमध्ये पात्र ठरल्यास रू.१.५० लक्ष पर्यंत अनुदान देय राहील.<br>२. स्वताच्या प्लॉटवर घर बांधण्यासाठी आलेल्या खर्चाच्या २५% (बांधकाम खर्चाची मर्यादा रू. ५ लक्ष) अनुदान देय राहील. |
| | | | क) रक्कम<br>१. रू.५०,०००/- पर्यंत अनुदान (Subsidy) अनुदान बँक/ | क) लाभ रक्कम<br>रू. २ लक्ष | क) प्राधान्यक्रम<br>१. दारिंदयरेषेखालील कामगार पिवळे<br>२. मागासवर्गीय कामगार<br>३. विशेष पात्रता |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वित्तीय संस्थाना अदा करण्यात येईल.<br>२. अर्जदाराचे कर्ज रू.२ लाखापेक्षा कमी असू नये . सदर कर्जाची रू.५००००/- अनुदान (Subsidy) वगळता उर्वरित रक्कम रू. १.५ लक्ष रक्कमेवरील ०५% पेक्षा जास्त दराने येणाऱ्या व्याजाची रक्कम मंडळामार्फत अदा करण्यात येईल.<br>३. अर्जदाराने घरबांधणीच्या पूर्णत्वाचा दाखला | | ४. फक्त दोन मुली असलेले कामागार<br>५. एका वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता (२,३ किंवा ४ वर्षे) नोंदीत बांधकाम कामगार |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| | व घरखरेदीच्या करारनाम्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. | | |
| | | ड) बांधकाम कामागरांना घरखरेदी/ बांधकामाकरीता रू.२ लक्ष पर्यंत बिन व्याजी कर्ज | |

उक्त तक्त्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबवावयाच्या योजनेचा प्रस्तावित तपशील खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| मंडळाचे नाव | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई |
| योजनेचे नाव | नोंदीत बांधकाम कामगाराच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बॅंकेकडून घेतलेल्या रू. ६ लक्ष च्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत |
| योजनेचा तपशील | पात्रता<br>१. मंडळाकडे सलग तीन वर्षे नोंदीत बांधकाम कामगार<br>२. कामगाराचे वय १८ ते ५२ वर्षे या दरम्यान असावे.<br>३. घरबांधणीकरीता कर्ज घेताना स्वत:च्या मालकीची जागा, सक्षम |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | |
|---|---|
| | प्राधिकाऱ्याने मंजूर केलेला आराखडा सादर करणे आवश्यक राहील.<br>४. घरखरेदी करताना घरखरेदीकरीता विकासकासोबत केलेला नोंदणीकृत करारनामा .<br>५. कर्ज घेतलेल्या घराची पती पत्नीची संयुक्त मालकी असावी.<br>६. सदर मालमत्तेवर कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद (Dispute) असू नये.<br>७. घरखरेदी किंवा घर बांधणी करीता घेतलेल्या कर्जाबाबत बँकेचे कर्जमंजूरीचे आदेश.<br>८. सदर योजनेचा लाभ एकाच घरासाठी (एकदाच) देय रहील. |
| योजनेचा लाभ | १. पात्रता धारण करीत असलेल्या बांधकाम कामागरास बँकेने मंजूर केलेल्या कर्जापैकी रू. ६ लक्ष पर्यंतच्या कर्जावरील संपूर्ण व्याज मंडळाकडून देण्यात येईल.<br>२. व्याजाची संपूर्ण रक्कम बांधकाम कामगाराच्या बँकेतील कर्ज खात्यात थेट जमा करण्यात येईल.<br>३. पात्र बांधकाम कामागरांना देय व्याजाची रक्कम बँकेच्या मासिक विवरणानुसार देय राहील. |

नोंदीत बांधकाम कामगाराच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या रू. ६ लक्ष च्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत व प्रस्तावित अटी शर्तींमध्ये योग्य तो बदल करून योजना मंजूरीबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

अध्यक्ष



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाच्या मान्यतेअंती मंजूर अटी शर्तीसह योजनामंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या रु. ६ लक्ष रक्कमेच्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देण्यात यावी. मंडळामार्फत द्यावयाची गृहकर्जावरील व्याजाची रक्कम बांधकाम कामगाराच्या बँकेच्या कर्ज खात्यात जमा करताना खालील अटींचे पालन करावे:**<br><br>**१. बांधकाम कामगार मंडळाकडे सलग तीन वर्षे नोंदीत असावा.<br>२. बांधकाम कामगाराचे वय १८ ते ५२ वर्षे या दरम्यान असावे.<br>३. बांधकाम कामगाराने घरबांधणीकरीता कर्ज घेताना स्वत:च्या मालकीची जागा, सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेला आराखडा सादर करणे आवश्यक राहील.<br>४. घरखरेदी करताना विकासकासोबत केलेला नोंदणीकृत करारनामा सादर करणे अनिवार्य राहिल.<br>५. बांधकाम कामगाराने कर्ज घेतलेल्या घराची मालकी पती-पत्नीची संयुक्त असावी.<br>६. सदर मालमत्तेवर बांधकाम कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद (Dispute) असू नये.<br>७. घरखरेदी किंवा घर बांधणी करीता घेतलेल्या कर्जाबाबत बँकेचे कर्जमंजूरीचे आदेश आवश्यक राहतील.<br>८. सदर योजनेचा लाभ कूटुंबाच्या एकाच घरासाठी (एकदाच) देय रहील.** |



अध्यक्ष



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | **उपरोक्त अटींचे पालन करणाऱ्या नोंदित बांधकाम कामगारांस गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत थेट बांधकाम कामगारांच्या बँकेकडील कर्ज खात्यात जमा करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ९. | **नोंदित बांधकाम कामगारांना कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण देणेबाबत.** | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०३.०९.२०१६ च्या बैठकीमध्ये व मा.मंत्री (कामगार) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कौशल्य वृध्दीकरण योजनेबाबत सविस्तर चर्चा होऊन Recognition of Prior Learning (RPL) for Construction workers या केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी करण्याबाबत मंडळाची मंजुरी घेण्यात आली होती. त्या अनुषंगाने दि.२७.०९.२०१६ रोजी च्या पत्रान्वये शासन मंजुरीस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.<br>उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने पत्र दि. २७.०२.२०१७ अन्वये सदर योजनेची अंमल बजावणी करण्यासाठी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या खाली नमूद प्रशिक्षण संस्थांना तसेच प्रशिक्षणाची नियतकालीक तपासणी करण्यासाठी केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या तपासणी संस्थापैकी (ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीज) खालील संस्थांना महसुल विभाग निहाय नियुक्ती करण्यात आले आहे. |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| अ.क्र. | विभागाचे नांव | ट्रेनिंग प्रोव्हायडर्स | असेसींग बॉडीज |
|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | लेबरनेट सर्विसेस इंडिया प्रा.लि., बंगलोर | इंडिया स्किल्स न्यु दिल्ली. |
| २. | पुणे विभाग | आय एल अॅन्ड एफ एस स्किल्स, नोएडा | इंडिया स्किल्स, न्यु दिल्ली |
| ३. | नाशिक विभाग | जी अॅन्ड जी स्किल्स डेव्हलपर्स प्रा.लि., पंचकुला | एकेजी, चंदीग्रड |
| ४. | नागपूर विभाग | सुशिल बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर | शिक्षा भारती न्यु दिल्ली |
| ५. | औरंगाबाद विभाग | भास्कर फाऊंडेशन, दिल्ली | वर्च्युअल एज्युकेशन ट्रस्ट |

उपरोक्त विभागनिहाय संस्था निश्चितीस मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली व दि.१६.०३.२०१७ रोजी संबंधित संस्थांसोबत करारनामा करण्यात आला.नियुक्त संस्थांमार्फत प्रशिक्षणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

सदर संस्थांमार्फत खालील विषयांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

१. Bar Bending
२. Masonry
३. Shuttering Carpentry
४. Plumbing
५. Painting
६. Scaffoding

सदर प्रशिक्षणाकरीता प्री असेसमेंट करीता रू.१,०००/-, पोस्ट असेसमेंट करीता रू.१,०००/- व

| | | |
|---|---|---|
| | | Training Cost @ Rs. २७.५० per hour १२० तासाचे रू.३,३००/- प्रती कामगार असा एकूण रू.५३००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.<br><br>➢ **<u>महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) मार्फत बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाकरीता प्राप्त प्रस्ताव</u>**<br>महाराष्ट्र शासन कौशल्य विकास विभागातंर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) ची स्थापना दि.१५.०२.२०११ रोजी करण्यात आलेली आहे. सदर समितीमार्फत राज्यतील कौशल्य विकासाच्या कार्यक्रमाचे/ प्रशिक्षणाचे नियोजन, समन्वय व संनियंत्रण करणे अपेक्षित आहे. राज्य शासनाच्या विविध विभागातील कौशल्य विकासाच्या योजना सदर सोसायटीमार्फत राबविण्यात येतात.<br><br>सद्यस्थितीत MSSDS मार्फत राज्यात २.५ लक्ष युवकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता आहे व भविष्यात १५ लक्ष युवकांना प्रशिक्षण देणे प्रस्तावित आहे. MSSDS मार्फत ९४ हजार युवकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे व ७३ हजार युवकाचे प्रशिक्षण प्रगतीवर आहे.<br><br>MSSDS च्या पॅनलवर बांधकाम क्षेत्रातील ७०० संस्थांना Empanel करण्यात आलेले आहे व सदर संस्थामार्फत ६५ हजार युवकांना प्रतिवर्ष कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे शक्य आहे. याशिवाय ४०० नोंदीत संस्थामार्फत ३६ हजार युवकांना कोशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे शक्य आहे. सबब MSSDS मार्फत १ लक्ष बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देता येणे शक्य आहे. बांधकाम कामगारांना प्रशिक्षण दिल्यानंतर ट्रेनिंग पार्ट्नर |

मार्फत नवीन ठिकाणी प्लेसमेंट मिळण्यासही मदत होईल.

MSSDS मार्फत खालील प्रशिक्षण देणे प्रस्तावित आहे.

| Sr. No. | Job Role/ Qualification name |
|---|---|
| 1. | Scaffolder Syestem |
| 2. | Track welder |
| 3. | Assistant Electrician |
| 4. | Bar Bender and steel Fixer |
| 5. | Construction painter & Decorator |
| 6. | Mason Concrete |
| 7. | Mason General |
| 8. | Mason Tiling |
| 9. | Shuttering Carpenter- Syestem |

वरील तक्त्यानुसार २ लक्ष बांधकाम कामागरांना पुरवावयाच्या प्रशिक्षणाकरीता अंदाजित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| General Category of Expenditure | Year 1 | Year 2 | Total |
|---|---|---|---|
| Total youth to be trained | 1,00,000 | 1,00,000 | 2,00,000 |
| Training funds requirement (@ average cost 20,000 per trainee) | 200.00 | 200.00 | 400.00 |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| in INR Crores | | | |
| Administration expenses @4%total funds requirement in INR crores | 210.00 | 210.00 | 420.00 |

उपरोक्त प्रशिक्षणाचे स्वतंत्ररित्या असेसमेंट करून प्रशिक्षणावर झालेला खर्च व त्यामुळे बांधकाम कामगारांना झालेला लाभ याची तपासणी करण्यात येईल. प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे MIS Syestem द्वारे Monitoring करणे प्रस्तावित आहे, असे मंडळ सचिव यांनी सादर केले.

तद्नंतर महाराष्ट्र शासन कौशल्य विकास विभागातंर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) चे आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तावित प्रशिक्षण योजनेचे मंडळाच्या बैठकीत सादरीकरण केले. त्याबाबतच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे:

- केंद्र व राज्य शासनाकडून सर्वांसाठी सन २०२२ पर्यंत घरे देण्याची योजना राबविण्यात येत आहे. त्यामूळे बांधकाम क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर कुशल बांधकाम कामगाराची आवश्यकता राहिल.
- राज्याच्या महसूली व आर्थिक उत्पन्नात बांधकाम क्षेत्राचा मोठा वाटा असणार आहे. याशिवाय सदर क्षेत्रात परकीय गुंतवणूकीलाही वाव आहे.
- महाराष्ट्र राज्यात इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात साधारणत: २७.०० लक्ष कुशल कामगारांची मागणी आहे.



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ➢ MSSDS कडून ९९,५९७ व्यक्तींना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे, ७८,०३३ व्यक्तीना प्रशिक्षण देण्यात येत आहे तर ४०,५५५ व्यक्तींचे असेसमेंट पुर्ण झालेले आहे.<br>➢ MSSDS च्या पॅनलवर/ नोंदणीकृत केंद्रांची संख्या ४५७८ आहे. दरवर्षी प्रशिक्षणाची क्षमता ४,१२,०२० एवढी आहे. यापैकी बांधका क्षेत्राशी संबंधित पॅनल/ नोंदणीकृत केंद्राची संख्या १२४५ आहे व सदर क्षेत्रातील प्रशिक्षण क्षमता १,१२,०५० आहे. समितीने या क्षेत्रातील १३७२ कामगारांना यापुर्वीच प्रशिक्षण दिलेले आहे व २५५० बांधकाम कामगारांचे प्रिशिक्षण चालु आहे.<br>➢ मंडळातील नोंदित २ लक्ष बांधकाम कामगारांना ५० तासाचे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदर कामगारांच्या प्रशिक्षणाचा खर्च रु ६८१७.५० /- प्रति प्रशिक्षणार्थी या दराने रु. १३६.३५ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.<br>➢ मंडळाकडे नोंदित नसलेल्या २ लक्ष बांधकाम कामगारांची नव्याने नोंदणी करून त्यांना ४०० तासाचे दिवसाचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदर कामगारांच्या प्रशिक्षणाचा खर्च रु. १८,४५०/- प्रति प्रशिक्षणार्थी या दराने रु. ३६९ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.<br>➢ नोंदित बांधकाम कामगारांना MSSDS संस्थेच्या पॅनलवरील संस्थांकडून प्रशिक्षण देण्यात येईल.<br>➢ प्रशिक्षित बांधकाम कामगारांचे प्रशिक्षणनंतरचे मुल्यांकन झाल्यानंतरच प्रमाणपत्र देण्यात येईल. |



अध्यक्ष



**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ➢ प्रशिक्षित बांधकाम कामगारांना प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.<br>➢ प्रशिक्षित बांधकाम कामगारांपैकी प्रशिक्षणानंतर ७५% बांधकाम कामगारांना Job Placement देण्यात येईल.<br>याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी असे सादर केले की, मंडळामार्फत सद्यस्थितीत राबविण्यात येत असलेल्या कौशल्य वृद्धीकरण (RPL) या योजनेमध्ये प्रशिक्षण देण्यात येत असलेल्या सहा ट्रेडची पुनरावृत्ती होवू नये, नवीन ट्रेडचे प्रशिक्षण देण्यात यावे याबाबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयुक्त यांनी सहमती दर्शविली.<br>तद्नंतर बांधकाम कामगारांना कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे, त्यामुळे कौशल्य विकास विभागामार्फत प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच सदर प्रशिक्षणादरम्यान कामगारांची नोंदणी वाढविणे व नोंदणी केलेल्या कामगारांची यादी मंडळास देण्यात यावी असे निदेश मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी दिले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समितीचे (MSSDS) आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाकरीता सादर केलेल्या प्रस्तावास मंडळाची मान्यता प्रदान** |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | **करण्यात येत आहे. मंडळाकडून कार्यरत RPL प्रशिक्षणामध्ये ट्रेडशिवाय अन्य ट्रेडचे प्रशिक्षण देण्यात यावे. याबाबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) कडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त करून शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.** |
| १०. | **मध्यप्रदेशच्या धर्तीवर अनुभवी स्वयंसेवी संस्था /NGO मार्फत कामगारांची नोंदणी करणेबाबत.** | याबाबत मंडळ सचिव असे सादर केले की,<br>➢ मध्य प्रदेश राज्यात नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या २५ लक्ष असून जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या ९ लक्ष आहे.<br>➢ मध्य प्रदेश राज्यात बांधकाम कामगारांची नोंदणी जन अभियान परिषद या स्वयंसेवी या संस्थेमार्फत करण्यात येते.<br>➢ दि.०१.०७.२०१७ पासून राज्यातील सर्व जिल्हयात ऑनलाईन पध्दतीने जन अभियान परिषद या स्वयंसेवी संस्थेमार्फत नोंदणी करण्यात येत आहे.<br>➢ जन अभियान परिषद या संस्थेचे पदाधिकारी/ अधिकारी खालीलप्रमाणे<br>अध्यक्ष — मा. मुख्यमंत्री<br>उपाध्यक्ष — कॅबिनेट मंत्री दर्जा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी — वरिष्ठ आयपीएस अधिकारी |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | जिल्हा स्तर — जिल्हा समन्वय अधिकारी<br>तालुकास्तर — तालुका समन्वय अधिकारी<br>ग्रामस्तर — स्वयंसेवक (२३०००)<br>➢ जन अभियान परिषद या स्वयंसेवी संस्थेच्या कार्यान्वयासाठी राज्य शासनाकडून अनुदान देण्यात येते.<br>➢ ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता गट विकास अधिकारी व शहरी भागातील नोंदणीकरीता मुख्याधिकारी नगरपालिका यांना नोंदणी अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे.<br>➢ संस्थेचे स्वयंसेवक ग्रामपातळीवर व शहरी भागातील बांधकाम कामगारांना समक्ष भेट देऊन डिजीटल अॅपद्वारे नोंदणी करून आवश्यक माहिती अनुक्रमे गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी नगरपरिषद (नोंदणी अधिकारी) यांचेकडे सादर केले जातात.<br>➢ डिजीटल अॅपद्वारे प्राप्त माहिती नुसार नोंदणी अधिकारी बांधकाम कामागरांची नोंदणी करून नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने निर्गमित केले जाते.<br>➢ बांधकाम कामगाराच्या नोंदणीकरीता ९० दिवसाचे प्रमाणपत्र संबंधित मालक किंवा स्वत: कामगाराने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येते.<br>➢ बांधकाम कामगारांना विविध योजनांचे लाभ वाटप संबंधित जिल्हयाचे जिल्हयाधिकाऱ्यामार्फत करण्यात येते, लाभ वाटपाकरीता आवश्यक निधी मंडळामार्फत वितरीत करण्यात येतो. माहे मार्च |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

२०१७ पर्यंत जमा उपकर रू.१५७५ कोटी व खर्च रूपये ५५२ कोटी एवढा आहे.

वरील नमूद केल्यानुसार मध्य प्रदेश राज्यात बांधकाम कामगारांची नोंदणी केली जाते.

**महाराष्ट्र राज्यात बांधकाम कामगारांची नोंदणी राबविण्याबाबत करण्यात येत असलेले कार्यवाही**

- मंडळाने नोंदणीकरीता गटविकास अधिकारी, पंचायत समिती व मुख्याधिकारी, नगरपरिषद/ वॉर्ड ऑफिसर मनपा यांना नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात आला होता. परंतु, सदर यादीमध्ये उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, उपअभियंता जलसंधारणा विभाग, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग व कामगार कल्याण मंडळाचे अधिकाऱ्यांना करण्याबाबत कळविण्यात आले होते. सादर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने अधिसूचनेचा मसुदा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार अधिसूचनेचा मसुदा शासनास सादर करण्यात आलेला आहे.
- बांधकाम कामगारांच्या नोंदणीची मुदत १ वर्ष वरून ०५ वर्षे करण्याबाबत मंडळच्या दि.०७.०९.२०१७ रोजीच्या तज्ञ समितीच्या बैठकीत ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला आहे.
- तज्ञ समितीमध्ये नोंदित बांधकाम कामगारांकडून घ्यावयाच्या वर्गणीची रक्कम दरमहा रु. ५/- ऐवजी रु. १/- एवढी करण्यात यावी. बांधकाम कामागांराची नोंदणी करताना रु.६०/- एवढी वर्गणीची रक्कम



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | एकाचवेळी प्राप्त करून ५ वर्ष एवढया कालावधीकरीता नोंदणी करावी व ५ वर्षानंतर पुढील कालावधीकरीता वरीलप्रमाणे रु. ६०/- एवढी वर्गणी प्राप्त करण्यात यावी. सदर बांधकाम कामगाराने एका वर्षात कमीत कमी ९० दिवस काम करणे आवश्यक आहे, असा ठराव सर्वानुते घेण्यात आला.<br><br>मध्यप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात अनुभवी स्वयंसेवी संस्था(NGO) नियुक्ती बाबत करावयाच्या कार्यवाही संदर्भात मंडळाच्या निर्णयास्तव प्रस्ताव सादर.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळस्तरावरुन बांधकाम कामगरांची नोंदणी वाढविण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे. तसेच, तज्ञ समितीने बांधकाम कामगारांची मासिक वर्गणी रु. ५/- ऐवजी रु. १/- अशी निश्चित केली आहे त्यास मंडळाची सहमती आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभाचे वाटप वाढविण्यासाठी मध्यप्रदेश या राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील अनोंदित बांधकाम कामगरांची नोंदणी करण्यासाठी अनुभवी स्वयंसेवी संस्था /NGO ची नियुक्ती करण्यात यावी. सदर संस्थेकडे जिल्हा, तालुका व ग्राम पातळीवरील बांधकामाच्या ठिकाणी जावून बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे परिपूर्ण अर्ज तयार करणे, नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर करणे,** |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | **नोंदणी झालेल्या बांधकाम कामगारांच्या ओळखपत्राचे वाटप करणे, नोंदित बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांचे लाभ मिळण्यासाठी मदत करणे इत्यादी कामे सोपविण्यात यावी. अनुभवी संस्था/NGO ची निवड ई-निविदा पद्धतीने करण्यात यावी. सदर प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| **११.** | **नोंदित बांधकाम कामगाराचा नैसगिक मृत्यु झाल्यास राबविण्यात आलेली रु. २ लाख अर्थसहाय्य योजना मंडळाच्या माहितीसाठी सादर.** | याबाबत मंडळ सचिव यांन असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि.०३.०९.२०१६ रोजीच्या बैठकीत बांधकाम कामगाराचा कामावर असताना किंवा नसताना कोणत्याही ठिकाणी नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रू. २ लाख इतके अर्थसहाय्य देण्याबाबत ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. सदर ठरावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी व पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना किंवा मंडळाची सदरची योजना यापैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभ संबंधित कामगाराच्या वारसास घेता येईल, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. सदर ठराव राज्य शासनास दि.२१.१०.२०१६ रोजी मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता.<br>सदर प्रस्तावास राज्य शासनाच्या दि.२४.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर पत्रात मंडळाकडील जे बांधकाम कमगार प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेचा लाभ देण्यासाठी वयाच्या निकषानुसार (वय वर्षे ५१ ते ६०) पात्र होणार नाही अशा सर्व नोंदणीकृत केवळ पात्र बांधकाम |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

कामगारांचा, नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यास रितसर रू. दोन लाख आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेचा लाभ देण्यात यावा असे नमूद आहे.

**प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेची कार्यपध्दती**

१. पात्रता :- १८ ते ५० वयोमर्यादा असलेले सहभागी बँकामधील बचतखाते धारक
२. विमा कालावधी :- १ वर्ष
३. विमा हप्ता :- रू.३३० प्रती कामगार प्रती वर्ष
४. फायदे :- कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास रू.२ लाखाचे विमा संरक्षण
५. शुल्क आकारणी :- बचत खात्यामधून ऑटो- डेबीट पध्दतीने
६. योजनेची ठळक वैशिष्टये :-

- एक वर्षाची जीवन विमा योजना
- प्रतिवर्षी पुर्ननोंदणी शक्य
- विमा कालावधीनंतरही विमा योजनेत सहभागी करणे शक्य
- नवनोंदीत कामगारांना भविष्यात विमा योजनेत सहभागी होणे शक्य
- सहभागी बँकामार्फत व भारतीय विमाआयुर्विमा महामंडळ अथवा इतर जीवन विमा कंपन्यामार्फत प्रशासित

शासनाच्या दि. २४.०७.२०१७ रोजीच्या पत्रास अनुसरून मंडळाच्या दि.२८.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचना सर्व जिल्हा कार्यालयांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. माहितीस्तव सादर

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगाराचा नैसगिक मृत्यु झाल्यास राबविण्यात आलेली रु. २ लाख अर्थसहाय्य योजनेस शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. ही बाब माहिसाठी सादर करण्यात आली. सदर माहितीची मंडळाकडून नोंद घेण्यात आली.** |
| १२. | **केंद्र शासनाच्या दिनांक ११.०७.२०१७ रोजीच्या सुचना मंडळाच्या माहितीसाठी सादर.** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, श्रम एंव रोजगार मंत्रालय, दिल्ली यांचे दि.११.०७.२०१७ रोजीचे पत्र मंडळास प्राप्त झालेले आहे.<br>बांधकाम कामगार मुख्यत्वे करून एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी कामाकरीता स्थलांतरीत होत असतात. नवीन ठिकाणी काम मिळेपर्यंत कामगारांना निवासाची व्यवस्था नसणे, शौचालयाची व्यवस्था नसणे अशा बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. ही बाब विचारात घेऊन स्थलांतरीत बांधकाम कामगारांकरीता ट्राझिंट निवास (Transist accomadation)/ लेबर शेड कम नाईट शेल्टर (Labour shed cum Night Shelter), मोबाईल टॉयलेट (Mobile Toilet), मोबाईल क्रेंच (Mobile Creche) इ. सुविधा सदर कामगार काम शोधत असण्याच्या ठिकाणी पुरविणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने दि.०८.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाचे कलम ६०अंतर्गत दिलेल्या सूचनांचे पालन करून सामाजिक सुरक्षा पुरविणे संदर्भातच्या बाबींना प्राधान्य देण्यात यावे व तदनंतर उपकराची रक्कम उपलब्ध असल्यास अधिनियमाच्या कलम २२ अंतर्गत |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | |
|---|---|
| | कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात यावा.<br>सदर सुविधा पुरविताना केंद्र शासनाने खालील अटी शर्तीचे पालन करण्याबाबत कळविले आहे.<br>१. जमीन शासकीय मालकीची असावी.<br>२. जमीन मध्यवर्ती ठिकाणी असावी.<br>३. सदर सुविधा प्रायोगिक तत्वावर १ ते २ शहरात राबवावी.<br>४. सदर सुविधा फक्त बांधकाम कामगारांकरीता राबवावी.<br>५. सदर सुविधाचे भाडे आकारणे व त्याचे रजिस्टर ठेवावे.<br>६. लाभधारकांना सर्व सुविधा पुरविणे व इमारतीची देखभाल करावी.<br>७. सदर सुविधांचा खर्च वार्षिक खर्चाच्या १०% पेक्षा जास्त नसावा.<br>८. अधिनियमाच्या कलम ३३, ३४, ३५ व ३६च्या तरतुदीस अनूसरूनच सदर सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात आणि त्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमाअन्वये सदर सुविधा बांधकामाच्या ठिकाणी व त्या आसपास बांधकाम कामगारांना पुरविणे नियोक्त्याची जबाबदारी आहे. सदर सुविधांचा वापर बांधकाम कामागरांकडून केला जातो किंवा नाही यांची खात्री करणे तसेच उक्त सर्व सुविधा पुरविणे हे नियोक्त्याचे काम आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांची नियोक्तयाकडे काम मिळाल्यानंतर |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | सदर सुविधा पुरविणे सूचित केले आहे.<br>केंद्र शासनाच्या उपरोक्त सूचनाबाबत विचारविनिमय करून करावयाच्या कार्यवाहीबाबत निर्णय घ्यावा.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: केंद्र शासनाच्या दिनांक ११.०७.२०१७ रोजीच्या सुचना मंडळाच्या माहितीसाठी सादर करण्यात आल्या, सदर सुचनांची मंडळाकडून नोंद घेण्यात आली.** |
| १३. | **विधानमंडळाच्या लोकलेखा समितीच्या २३ व्या अहवालातील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २०१३-२०१४ चा आर्थिक** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांना असे सांगितले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम १९९६ मधील अधिनियम २७(२) नुसार मंडळाचे लेखापरिक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांजकडुन करण्यात येते.<br>त्यानुसार मंडळाच्या दि. दि. ०१.०४.२०१२ ते ३१.०३.२०१४ या वर्षाचे लेखापरिक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांजकडुन दि. ३०.०४.२०१४ ते १९.०९.२०१४ या कालावधीत करण्यात येवुन तसा लेखापरिक्षण अहवाल मंडळास सादर करण्यात आला होता. सदर लेखापरिक्षण अहवालातील गंभीर परिच्छेदांचा समावेश लेखा परिच्छेद क्र. ३.३.(१ ते ७) मध्ये होवुन सदर परिच्छेदांच्या कार्यवाही बाबतची मा. प्रधान सचिव (कामगार) यांची दि. २८.०४.२०१६ रोजी लोक लेखा समिती समोर विधान भवन येथे साक्ष |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **क्षेत्र अहवानलातील उद्योग, ऊर्जा व कामगार (कामगार) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३) वरील शिफारशी मंडळाच्या माहितीस्तव सादर.** | होवुन समितीस उपस्थित परिच्छेदांची कार्यवाही आश्वासित केली होते. त्याबाबत समितीच्या खालील मुद्यांवरील शिफारशीचा सविस्तर तपशिल मंडळास सादर करण्यात आला.<br>भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील मंडळाच्या कामकाजासंदर्भात लोक लेखा समितीच्या २३ व्या अहवालातील परिच्छेद क्र. ३.३. बाबतच्या शिफारसी खालील प्रमाणे आहेत.<br>१. परिच्छेद क्र..३.३.२ “नियम तयार करणे आणि मंडळ व समित्यांचे गठण करणे”<br>२. परिच्छेद क्र. ३.३.३.१ : “मंडळाचे कामकाज”<br>३. परिच्छेद क्र. ३.३.३.२ : “ लाभार्थ्यांची नोंदणी ”<br>४. परिच्छेद क्र.३.३.४ :उपकराचे संकलन, प्रेषण आणि निर्धारण<br>५. परिच्छेद क्रमांक ३.३.३.५ : कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी<br>१.९ (अ) अंत्यसंस्कारासाठी तात्काळ सहाय्य्<br>१.१०(ब) नैसर्गिक प्रसूती व सिझेरियन प्रसुतीसाठी<br>१.११(क) लाभार्थ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक सहाय्य्<br>(ड) जनश्री विमा योजना |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | (ई) लॅपटॉप वाटप<br>६. परिच्छेद क्र. ३.३.६ : "वित्तीय व्यवस्थापन"<br>७.परिच्छेद क्रमांक ३.३.३.४: " न वटलेले धनादेश<br>८.परिच्छेद क्रमांक ३.३.७ अंतर्गत नियंत्रण आणि संनियंत्रण कार्यतंत्र<br>९. परिच्छेद क्रमांक ३.३.७ अंतर्गत नियंत्रण आणि संनियंत्रण कार्यतंत्र<br>विधानमंडळाच्या लोकलेखा समितीने उपरोक्त परिच्छेदास अनुसरून केलेल्या शिफारशीबाबत मंडळास सादर केलेल्या सविस्तर अहवालावर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: विधानमंडळाच्या लोकलेखा समितीच्या २३ व्या अहवालातील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २०१३-२०१४ चा आर्थिक क्षेत्र अहवानलातील उद्योग, ऊर्जा व कामगार (कामगार) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३) वरील शिफारशीची मंडळाकडून नोंद घेण्यात आली. लोकलेखा समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल शासनामार्फत लोकलेखा समितीस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.** |
| १४. | **नोंदित बांधकाम कामगारांच्या** | मंडळाने वेळोवेळी पारीत केलेल्या ठरावानुसार खालील बँकांमध्ये मंडळाचे खाते उघडण्यात आलेले आहे. मंडळाचे बँक खात्यांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**नोंदणी/ नुतणीकरणाची फी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्यासाठी नवीन बँक खाते उघडणे.**

| अ.क्र. | बँकेचे नाव | शाखा | बचत/चालू खाते | खाते क्र. | उद्येश | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बँक आर्फ इंडिया | ताडदेव | बचत | ००४२१०११०००९९२९ | उपकर | कार्यान्वित |
| २. | बँक आर्फ इंडिया | ताडदेव | चालू | ००४२२०११००००१५३ | उपकर | कार्यान्वित |
| ३. | बँक ऑफ महाराष्ट्र, | कलानगर | बचत | ६०१२३१००५२२ | उपकर | कार्यान्वित |
| ४. | बँक ऑफ महाराष्ट्र, | कलानगर | चालू | ६८०००५५५२२० | उपकर | बंद |
| ५. | युनियन बँक आर्फ इंडिया | पाली हिल | बचत | ४४४३०२०१०१०४९२० | उपकर | कार्यान्वित |
| ६. | सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया | बि.के.सी. | बचत | ३२३०८२१८६४ | नोंदणी व नुतणीकरण वर्गणी | कार्यान्वित |
| ७. | सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया | बि.के.सी. | बचत | ३१४३०४४४८८ | मंडळाचे खर्चासाठी | बंद |

मंडळाचे बँक ऑफ महाराष्ट्र, कलानगर बांद्रा, बँक आर्फ इंडिया, ताडदेव रोड व सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया बीकेसी येथील बँक खाते बंद करण्याबाबत व युनियन बँक आर्फ इंडिया येथे नव्याने खाते उघडण्याबाबत दि. ०३.०९.२०१६ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | **मंडळांतर्गत उपकराची रक्कम जमा करणेसाठी उघडण्यात आलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र, बांद्रा (पूर्व), येथील व बँक ऑफ इंडिया येथील TDS Payment साठी उघडण्यात आलेले खाते बंद करण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया येथिल नोंदणी फी/वर्गणी फी व कार्यालयीन खर्चासाठी उघडण्यात आलेले खाते सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांची सेवा समाधानकारक नसल्याने बंद करण्यात यावे. तसेच युनियन बँक ऑफ इंडिया, बांद्रा (प.) येथिल बँकेत कामगार नोंदणी फी व वर्गणी फी भरण्यासाठी नव्याने खाते उघडण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. त्यानुसार संबधित बँका व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात यावे, असेही ठरले.**<br><br>सदर बैठकीच्या इतिवृत्तांस मंडळाच्या दि. २४.१०.२०१६ च्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.<br><br>बँक ऑफ महाराष्ट्र, कलानगर बांद्रा येथील खाते बंद करण्याबाबत सर्व विभागीय व जिल्हा कार्यालयांना दि. २९.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून संबंधित जिल्हातील उपकर जमा करणाऱ्या प्राधिकरणांना कळविणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे. तथापि काही प्राधिकरणांकडून अद्यापही बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये उपकराची रक्कम जमा करण्यात येत आहे. |

बँक ऑफ इंडीया, ताडदेव शाखा येथील TDS Pyment साठी उघडण्यात आलेले खाते बंद करण्यात आलेले आहे.

सेंन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे खाते अद्याप बंद करण्यात आलेले नाही. तसेच युनियन बँकेकडून नवीन खाते उघडण्याबाबत प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर बँकंत नवीन खाते उघडण्यात आलेले नाही.

मंडळाच्या विविध बँक खात्यामधील मागील ३ वर्षात जमा उपकराचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | बँकेचे नाव | रक्कम रू.(कोटीत) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ (जुलै अखेर पर्यंत ) |
| १. | बँक ऑफ इंडीया ताडदेव शाखा, मुंबई | ६९५.१२ | ९३८.१५ | ९२६.६८ | ३७०.५९ |
| २. | बँक ऑफ महाराष्ट्र कलानगर | ७६.२२ | १०५.८६ | ८५.३५ | २०.५४ |
| ३. | युनियन बँक ऑफ इंडिया | ३०.७७ | ६६.०२ | ५७.८३ | १८.३० |
| | एकुण | ८०२.११ | १११०.०५ | १०६९.८४ | ४०९.४३ |

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या दि. ०३.०५.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | विविध आस्थापनांकडून उपकर जमा करण्यासाठी नवीन बँक खाते उघडण्याबाबत सविस्तर चर्चा होवून "मंडळाचे खाते सन २००७ पासून बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेत आहे. सदर बचत खात्याची रक्कम बचत खात्याऐवजी त्याच बँकेत मंडळाच्या पुढील गुंतवणूकीपर्यंत Auto Sweep पध्दतीने गुंतवणूक करून जास्तीचा किती व्याजदर प्राप्त करता येईल. याबाबत बँक ऑफ इंडियास विचारणा करण्यात यावी. बँक ऑफ इंडिया या पध्दतीने इतर बँकेएवढा जास्तीचा व्याजदर देण्यास व मंडळाला आवश्यक उपकर जमेचा तपशिल सादर करण्यास सहमत नसल्यास अन्य राष्ट्रीयकृत व शेडयुल्ड बँकेकडून प्रस्ताव प्राप्त करून बचत खात्यावर अधिकतम व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत किंवा खाजगी शेडयुल्ड बँकेमध्ये एक बचत खाते उघडण्यात यावेत" असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.<br><br>उपरोक्त ठरावानुसार मंडळाचे खाते असलेल्या बँक ऑफ इंडिया, ताडदेव शाखा, मुंबई यांनी मंडळाच्या खात्यावरील रक्कम Autosweep पध्दतीने गुंतवणुकीबाबतच्या व्याजदराबाबत विचारणा करण्यात आली होती त्यानुसार बँकेने Autosweep व्दारे गुंतवणुकीवर ४% व्याज दर देण्यात येईल असे कळविले होते. त्याप्रमाणे मंडळाने सदर खात्यावरील रक्कम Autosweep व्दारे गुंतवणुक करण्याबाबत बँकेस अनुमती देण्यात आली आहे.<br><br>मा. सर्वोच्च न्यायालयात सादर जनहित याचिकेनुसार मंडळाकडे जमा असलेला उपकर अपेक्षेपेक्षा कमी |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| | आहे. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने मंडळास अपेक्षीत असलेला उपकर का जमा झालेला नाही, विविध उपकर जमा करणाऱ्या संस्थांनी वसूल केलेला उपकर मंडळाच्या खाती जमा केला किंवा कसे याची तपासणी करण्याबाबत मा. महालेखापालांना सुचित करण्यात आले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा. महालेखापालांना शासनामार्फत वर्षनिहाय जमा उपकर व जमा उपकरापैकी मंडळाकडे जमा न झालेल्या मंडळाकडून वर्षनिहाय जमा उपकराचा तपशिल सादर करण्यात आला तथापि, ज्या उपकर जमा करणाऱ्या संस्थांनी उपकराची वसूली केली तथापि, मंडळाची खाती जमा केला नाही याचा तपशिल सादर करता आला नाही तसेच मंडळाकडे बँक ऑफ इंडियामार्फत जमा उपकराचा संस्थानिहाय तपशिल देता आला नाही यासंदर्भात बँकेकडे शासन निर्णयातील तपशिलानुसार माहिती देणेबाबत कळविण्यात आले तथापि सदर माहिती बँकेकडून प्राप्त होउ शकली नाही याशिवाय न वटलेले धनादेश, न वटलेल्या धनादेशापोटी आकारणी केलेले शुल्क, सेवा शुल्क, Unexplained Entries इत्यादीबाबत वारंवार सुचना देउनही बँक ऑफ इंडियाकडून प्रतिसाद मिळत नाही.<br>केंद्र शासनाच्या स्तरावर घेण्यात येत असलेल्या आढावा बैठकीत मंडळाकडे जमा उपकरापैकी शासकीय विभागाकडून जमा उपकर व आराखडे मंजूर करतांना खाजगी संस्थाकडून जमा उपकर याची विगतवारी सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे तथापि बँकेकडून तपशिलवार माहिती अभावी सदर |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| | माहिती केंद्र शासनास सादर करता आली नाही.<br>मंडळाच्या बँक ऑफ इंडिया, ताडदेव शाखा येथील बँक व्यवहाराबाबत वारंवार सुचना देऊनही अपेक्षीत प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे मंडळाने पारीत केलेल्या दि. ०३.०५.२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार सदर खाते बंद करून अन्य राष्ट्रीयकृत बँकेंत बचत खाते उघडण्याबाबत प्रस्तावित आहे.<br>तदनुषंगाने दि. १४.०९.२०१७ रोजी २१ राष्ट्रीयकृत बँकेंपैकी १७ राष्ट्रीयकृत बँकांना उपकराअंतर्गत जमा होणाऱ्या रक्कमेसाठी नवीन बँक खाते उघडण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आला होता. संबंधित माहिती मंडळाच्या E-mail वर दि. १८.०९.२०१७ रोजी ४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावी असे सदर प्रस्तावामध्ये नमूद करण्यात आले होते.<br>वरील पत्राच्या अनुषंगाने १७ बँकेंपैकी खालील ०७ बँकांचे प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेले आहेत. |

| अ.क्र. | बँकेंचे नाव |
|---|---|
| १. | अलाहाबाद बँक |
| २. | युको बँक |
| ३. | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया |
| ४. | स्टेट बँक ऑफ इंडिया |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| ५. | बँक ऑफ बडोदा |
| ६. | कॅनरा बँक |
| ७. | पंजाब सिंध बँक |

उपरोक्त ०७ बँकांकडून मागविण्यात आलेल्या माहितीचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रात नमूद करण्यात आलेला आहे. सदर तपशिलानुसार बॅकेच्या राज्यातील शाखांची संख्या, कार्यरत कर्मचारी व बँकेने देवू केलेल्या अन्य सवलती विचारात घेता स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेमध्ये नवीन बचत खाते उघडणे प्रस्तावित आहे.

बँक ऑफ इंडिया मधील चालू खाते क्र ००४२२०११०००१५३ व बचत खाते क्र. ००४२१०११०००९९२९ बंद करून स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन बचत खाते उघडण्याबाबत प्रस्तावित आहे.

यावर कामगार प्रतिनिधी श्री. भुताड यांनी स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये आधीच खूप व्याप असल्याने मंडळाला आवश्यक असलेली सेवा समाधानकारक मिळेल की नाही अशी शंका व्यक्त केली. त्यावर मा. संचालक (लेखा व कोषागारे) श्री. नकवी यांनी राज्य शासनाचे सर्व आर्थिक व्यवहार स्टेट बँक ऑफ इंडिया



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

कडून करण्यात येत आहेत त्यामुळे स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन खाते उघडण्यात यावे, असे स्पष्ट मत व्यक्त केले. तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया च्या प्रतिनिधींसोबत बैठक आयोजित करून मंडळासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधांबाबत माहिती देणे व त्यांच्यासोबत Service Level Agreement (SLA) करावा असेही सुचही केले.

मा. कामगार आयुक्त यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये तात्काळ नवीन खाते उघडण्यात यावे व बँक ऑफ इंडियाचे खाते बंद करण्यात यावे. सदर बदल क्षेत्रिय कार्यालयांना त्वरीत कळविण्यात यावा. दरम्यानच्या कालावधीत उपकराच्या रक्कमा बँक ऑफ इंडियाच्या जुन्या खात्यात जमा झाल्यास सदर रक्कम तातडीने मंडळाच्या स्टेट बँक ऑफ इंडियाकडील नवीन खात्यात वर्ग करण्याबाबत बँक ऑफ इंडियाला कळविण्यात यावे, असे स्पष्ट केले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणी/ नुतणीकरणाची फी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्यासाठी मंडळाचे बँक ऑफ इंडिया, ताडदेव रोड शाखा येथील खाते बंद करावे व स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन खाते उघडण्यात यावे. तसेच, स्टेट बँक ऑफ इंडिया च्या प्रतिनिधींसोबत बैठक आयोजित करून मंडळासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधांबाबत त्यांच्यासोबत Service Level Agreement (SLA) करण्यात यावा. सदर बदल क्षेत्रिय**

| | | |
|---|---|---|
| | | **कार्यालयांना त्वरीत कळविण्यात यावा. दरम्यानच्या कालावधीत क्षेत्रिय कार्यालयाकडून उपकराच्या रक्कमा बँक ऑफ इंडियाच्या जुन्या खात्यात जमा झाल्यास सदर रक्कम तातडीने मंडळाच्या स्टेट बँक ऑफ इंडियाकडील नवीन खात्यात वर्ग करण्याबाबत बँक ऑफ इंडियाला कळविण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.** |
| १५. | **मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीबाबात मंडळाच्या दिनांक ०३.०५.२०१७ रोजीच्या ४० व्या बैठकीतील मंजूर धोरणात बदल करणेबाबत विचार करणे.** | शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.उ. दिनांक २७.१०.२०१५ नुसार राज्य सार्वजनिक उपक्रमातील अतिरिक्त निधीची गुंतवणूक शेडयुल्ड बँके पैकी स्टेट बँक व त्याची असोसिएट बँक, राष्ट्रीयकृत बँक व किमान नक्त मत्ता (Net Worth) ४००० कोटी असलेल्या बँकेत करता येते. तसेच बँकेच्या नक्त मुल्याच्या १५% पेक्षा अधिक निधी एका बँकेत गुंतवू नये व गुंतवणुकीबाबत इतर मार्गदर्शक तत्वे व सूचना सदर शासन निर्णयात नमूद आहेत.<br>मंडळाच्या उपसमितीच्या दि. ०२.०५.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये राष्ट्रीयकृत व खाजगी शेडयुल्ड गुंतवणुक करतांना खालील निकष ठरवण्यात आलेले आहे.<br>१. राष्ट्रीयकृत बँक व खाजगी शेडयुल्ड बँकेत गुंतवणूक करताना ६०:४० या प्रमाणात करावी.<br>२. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी शेडयुल्ड बँकेतील गुंतवणूक एकूण रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये. |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ३. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा खाजगी शेडयुल्ड बँकेमध्ये एका वेळची गुंतवणूक रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>मंडळाच्या दि.०३.०५.२०१७ रोजीच्या ४० व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ३ अन्वये उपसमितीने गुंतवणुकीसाठी निश्चित केलेल्या उपरोक्त निकषाला अनुसरून खालीलप्रमाणे ठराव पारीत केला होता.<br>१. राष्ट्रीयकृत बँक व खाजगी शेडयुल्ड बँकेत गुंतवणूक करताना ६०:४० या प्रमाणात करावी.<br>२. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी शेडयुल्ड बँकेतील गुंतवणूक एकूण रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>३. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा खाजगी शेडयुल्ड बँकेमध्ये एका वेळची गुंतवणूक रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>४. मंडळाची गुंतवणूक करताना उपरोक्त ६०:४० या प्रमाणात गुंतवणूकीस राष्ट्रीयकृत / खाजगी शेडयुल्ड बँकेकडून प्रतिसाद न मिळत असल्यास किंवा रु. १००० कोटी पेक्षा जास्त् गुंतवणूक होणार असल्यास त्यादिवशीची प्रस्तावित गुंतवणूक स्थगित ठेवावी व तद्नंतरच्या बैठकीत विचारात घ्यावी.<br>मंडळाची गुंतवणूक सुरक्षित असून त्यावर कर्ज/ तारण/ओव्हरड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र दरमहा प्राप्त करावे व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ मधील तरतूदीनुसार मंडळाच्या गुंतवणूकीचा |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | |
|---|---|
| | त्रैमासिक अहवाल प्रशासकीय विभागास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यता आला होता.<br>उपसमितीने दि. ०३.०५.२०१७ रोजी निश्चित केलेले गुंतवणूकीच्या निकषाबाबत फेर विचार करण्यासाठी मा. संचालक लेखा व कोषागारे यांनी मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांना केलेल्या विनंतीनुसार **दि. १७.०५.२०१७** रोजी मा. मंत्री महोदय, (कामगार) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सदर बैठकीमध्ये मा. संचालक लेखा व कोषागारे यांनी असे सुचित केले की, शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.उ. दिनांक २७.१०.२०१५ मधील तरतूदीनुसार सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) खाजगी शेडयुल्ड बँकांऐवजी राष्ट्रीयकृत बॅकेत गुंतवणूक करणे योग्य राहील. सदर प्रस्तावावर उपसमितीने सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे मंडळाच्या गुंतवणूकीचे सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे.<br>१. मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक केवळ राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात यावी.<br>२. कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतील एकूण गुंतवणूक रु. ५०० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>३. कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये एका वेळची गुंतवणूक रु. ५०० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>उपरोक्त सुधारित निकषास दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करून |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

"मंडळाच्या अतिरिक्त निधीचे गुंतवणूकीकरीता उपसमितीने दिनांक १७.०५.२०१७ रोजी मंजूर केलेल्या गुंतवणूकीच्या सुधारित निकषास सर्वानुमते मान्यता देण्यात आली" असा ठराव घेण्यात आला होता.

उपरोक्त ठरावास अनुसरून दि. २९.०६.२०१७ रोजी उपलब्ध अतिरिक्त निधी रू. १७०० कोटीपैकी रू. ५०० कोटी व दि. २४.०८.२०१७ रोजी उपलब्ध रू. १५०० कोटीपैकी रू. ५०० असे एकुण रू. १००० कोटी (एक हजार कोटी) खालील राष्ट्रीयकृत बँकेमध्ये गुंतवणुक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वतेनंतर मिळणारी रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | युनियन बँक ऑफ इंडिया | ४४४३०३०३००७५५०३ | २९.०६.२०१७ | २९.०६.२०१८ | ५०० | ५.९० | ५३०.१५ |
| २. | कॅनरा बँक | KB९९३८७३ | २४.०८.२०१७ | २४.०८.२०१८ | ५०० | ५.९० | ५३०.१५ |
| | | एकुणात | | | १०००/- | | १०६०.३०/- |

मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीची रक्कम रू. ५०० कोटीपेक्षा जास्त असल्यास एका बैठकीमध्ये केवळ रू. ५०० कोटी एवढी गुंतवणुक करण्यात येते व उर्वेरित निधीसाठी पुनश्च: उपसमितीची

| | | |
|---|---|---|
| | | बैठक बोलावण्यात येते. सदर बैठकीनंतरही शिल्लक असणाऱ्या रक्कमेकरीता पुनश्च: बैठक आयोजित करावी लागते यामध्ये वेळेचा अपव्यय होतो, याशिवाय गुंतवणुकीअभावी शिल्लक असणारी रक्कम बचत खात्यात पुढील बैठकीपर्यंत पडुन राहते त्यामुळे मंडळाला मिळणाऱ्या व्याजाचेही नुकसान होते.<br>सबब सदर गुंतवणुकीच्या धोरणातील कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेंतील एकुण गुंतवणूक रु. ५०० कोटीपेक्षा जास्त असू नये व कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये एका वेळची गुंतवणूक रु. ५०० कोटीपेक्षा जास्त असू नये. या अटीमध्ये बदल करून मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणुक जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात यावी. सदर अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीस मर्यादा न ठेवता उपलब्ध सर्व रक्कमेची गुंतवणुक जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेत करावे जेणेकरून मंडळाच्या व्याजाचे नुकसान होणार नाही.<br>मंडळाच्या दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीतील ठरावात उपरोक्त प्रमाणे बदल करण्याच्या मान्यतेस सादर.<br>यावर मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांनी असे मत व्यक्त केले की, यांनी तीन विभाग करून गुंतवणूक करण्यात यावी. त्यावर एकाच दिवशी वेगवेगळ्या दराने गूंतणूक करता येणार नाही, असे स्पष्ट मत मा. कामगार आयुक्त यांनी व्यक्त केले. ज्या बँकेचे दर व्याजदर सर्वात जास्त असतील त्या बँकेत गुंतणूक |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात यावी असेही सुचविले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीबाबत मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजी पारीत केलेल्या ठरावानुसार कार्यवाही करताना येणाऱ्या उपरोक्त अडचणी व एका वेळी एका बँकेत गुंतवणूकीच्या मार्यादेत होणारे व्याजाचे नुकसान विचारात घेता गुंतवणूकीच्या धोरणात अंशत: बदल करून राष्ट्रीयकृत बँकेत एकाच वेळी गुंतवणूकीची रु. ५०० कोटीची मर्यादा शिथील करून त्या दिवशी ज्या राष्ट्रीयकृत बँकेचे व्याजदर सर्वात जास्त असतील त्या राष्ट्रीयकृत बँकेत त्या दिवशीच्या प्रस्तावित रक्कमेची गुंतणूक करण्यात यावी. तसेच त्या दिवशीच्या गुंतवणूक प्रक्रीयेत सहभागी राष्ट्रीयकृत बँकापैकी अन्य बँक त्या दिवशीच्या अधिकत्तम दराने व्याज देण्यास तयार असेल तर प्रस्तावित गुंतवणूकीची रक्कम विभागून गुंतवणूक करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १६. | **इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम** | इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अंतर्गत बांधकाम कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करण्यात येते व नोंदणीकृत बांधकाम कामगारांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येतो. |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | १९९६ (१९९६ चा २७) च्या कलम २ च्या खंड (घ) नुसार २१ बांधकाम कामांची दिनांक १८.०८.२०१७ रोजी निर्गमित केलेली अधिसूचना मंडळाच्या माहितीस्तव सादर. | इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २ (ड) मध्ये ' इमारत व इतर बांधकाम कामांची' व्याख्या खालीलप्रमाणे दिलेली आहे.<br>"बांधकाम, फेरफार, दुरूस्ती, देखभाल किंवा पाडून टाकणे इत्यादी इमारत, रस्ते,मार्ग, रेल्वे, ट्रॅमवेज, एअर फिल्डस, पाठबंधारे, जलनिस्सारण, बंधारा व नेव्हीगेशन काम, पूर नियंत्रणाचे काम (वादळामुळे जलनिस्सरणाच्या कामासहित), तेल व वायुची जोडणी आणि समुद्रापार दळणवळण, धरणे, कालवे, जलाशये, जलप्रवाह, बोगदे, पूल, सेतू, सेतूप्रणाली, पाईपलाईन, टॉवर्स, कुलींग टॉवर्स, पारेषण टॉवर्स इ. प्रकारची कामे समुचित शासन अधिसूचनेद्वारे लागू करू शकते.<br>केंद्र शासनाने दि.१२.०७.२०१३ रोजीच्या पत्रान्वये इमारत व इतर बांधकाम कामांच्या कक्षेत २१ बांधकाम कामांचा समावेश करण्यात निर्देशित करण्यात आलेले होते. त्यानुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास अनुसरून शासनाने सदर २१ बांधकाम कामांचा समावेश असलेली अधिसूचना दि.१८.०८.२०१७ रोजी निर्गमित केलेली आहे. (प्रत संलग्न) सदर २१ बांधकाम कामांची यादी खालीलप्रमाणे<br>१. दगड कापणे, फोडणे व दगडाचा बारीक चुरा करणे<br>२. लादी किंवा टाईल्स कापणे व पॉलिश करणे |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| | ३. रंग, वॉर्निश लावणे, इत्यादीसह सुतारकाम<br>४. गटार व नळजोडणीची कामे<br>५. वायरिंग, वितरण, तावदान बसविणे इत्यादीसह विद्युत कामे<br>६. अग्निशमन यंत्रणा बसविणे व तिची दुरूस्ती करणे.<br>७. वातानुकूलित यंत्रणा बसविणे व तिची दुरूस्ती करणे.<br>८. उद्वाहने, स्वयंचलित जिने इत्यादी बसविणे.<br>९. सुरक्षा दरवाजे उपकरण इत्यादी बसविणे.<br>१०.लोखंडाच्या किंवा धातूच्या ग्रिल्स, खिडक्या, दरवाजे तयार करणे व बसविणे.<br>११.जलसंचयन संरचनेचे बांधकाम करणे.<br>१२. सुतारकाम करणे, आभाशी छत, प्रकाश व्यवस्था, प्लास्टर ऑफ पेरीस यांसहीत अंतर्गत (सजावटीचे) काम.<br>१३. काच कापणे,काचरोगण् लावणे व काचेची तावदाने बसविणे.<br>१४. कारखाना अधिनियम, १९४८ खाली समावेश नसलेल्या विटा, छप्परांवरील कौल इत्यादी तयार करणे.<br>१५. सौर तावदाने इत्यादींसारखी उर्जाक्षम उपकरण बसविणे. |

अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | १६. स्वयंपाकखोली सारख्या ठिकाणी वापरण्यासाठी मोडुलर (आधुनिक) युनिट बसविणे..<br>१७. सिमेन्ट काँक्रिटच्या साचेबध्द वस्तू इत्यादीसह खेळ किंवा मनोरंजनाच्या सुविधांचे बांधकाम करणे.<br>१८. जलतरण तलाव, गोल्फचे मैदान इत्यादीसह खेळ किंवा मनोरंजनाच्या सुविधांचे बांधकाम करणे.<br>१९. माहिती फलक, रोड फर्निचर, प्रवाशी निवारे किंवा बस स्थानके, सिग्नल यंत्रणा इत्यादी बांधणे किंवा उभारणे.<br>२०. रोटरीजचे बांधकाम करणे, कारंजे बसविणे इत्यादी.<br>२१. सार्वजनिक उद्याने, पदपथ, रमणीय भू-प्रदेश इत्यादींचे बांधकाम<br>उक्त अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आलेले आहे.<br>**ठराव: इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ (१९९६ चा २७) च्या कलम २ च्या खंड (घ) नुसार २१ बांधकाम कामांची दिनांक १८.०८.२०१७ रोजी निर्गमित केलेली अधिसूचना मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात आली, त्याची मंडळाकडून नोंद घेण्यात आली.** |
| **१७.** | **आयत्या वेळचे** | **विषय क्र.१: मंडळामध्ये मजूर सहकारी संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची मंडळामध्ये नोंदणी करणेची कार्यवाही करणे.** |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | विषय. | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळामध्ये मजूर सहकारी संस्थेअंतर्गतत काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची मंडळामध्ये नोंदणी करून त्यांना मंडळांतर्गत देण्यात येत असलेल्या विविध योजनांचे लाभ देता येणे शक्य आहे का त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत सहाय्यक कामगार आयुक्त लातूर कार्यालयास कळविण्यात आले होते.<br>लातूर जिल्हयात आजमितीस ५०१ मजूर सहकारी संस्था नोंदीत असून एका संस्थेचे २५ सभासद या प्रमाणे जिल्हयात मजूर सहकारी संस्थेचे १२५२५ इतके सभासद आहेत. मजूर सहकारी संस्थेमार्फत काम करणाऱ्या बांधकाम कामगारांचे कामाचे दिवस निश्चित नाहीत कार्यरंभ आदेशामध्ये नमूद कालावधीमध्ये काम पूर्ण करण्याचे बंधन मजूर सहकारी संस्थेवर असते. मजूर सहकारी संस्थेद्वारे कामावर लावण्यात आलेल्या कामगारांना ओळखपत्र दिले जाते. तसेच त्यांचे कामाचे अभिलेख ठेवले जातात.<br>एका मजूर सहकारी संस्थेचे किमान २५ सभासद असतात, अशा प्रकारच्या मजूर सहकारी संस्था हया शासनाच्या विभागाकडे नोंदीत असल्यामुळे त्याचेवर कायदेशीर बंधन आहेत. मजूर सहकारी संस्थेस देण्यात आलेल्या कामाचा कालावधी हा जर तीन महिन्यापेक्षा जास्त असेल तर अशा नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थेस मागील वर्षात ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार बहाल केल्यास लातूर जिल्हयात साधारणात: १२५२५ इतक्तया मजूराची मंडळात नोंदणी करणे शक्य आहे. याशिवाय सदरचे मजूर हे स्थानिक |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | असल्यामुळे त्यांना मंडळाच्य योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळणे शक्य होणार आहे<br>मजूर सहकारी संस्थेंतर्गत बांधकाम मजूर म्हणून काम करणाऱ्या बांधकाम मजूरांना मंडळात नोंदीत करून घेण्यापूर्वी व असे अधिकार मजूर सहकारी संस्थेस प्रदान करण्यापूर्वी खालील कागदपत्रे संबंधित मजूर सहकारी संस्थेकडून उपलब्ध करून घ्यावीत असे सहाय्यक कामगार आयुक्त, लातूर यांनी प्रस्तावित केले आहे.<br>१. मजूर सहकारी संस्थेचा नोंदणी दाखला<br>२. मजूर सहकारी संस्थेची अधिकृत सभासद संख्या<br>३. मजूर सहकारी संस्थेस मिळालेले कार्यरंभ आदेश<br>४. कामावर असलेल्या मजूरास संस्थेने प्रदान केलेले ओळखपत्र<br>५. मजूर सहकारी संस्थेचा अध्यक्ष/ सचिव यांनाच बांधकाम मजूरास ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार<br>सहाय्यक कामगार आयुक्त, लातूर कार्यालयाने सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावानुसार राज्यातील सर्व जिल्हयातील मजूर सहकारी संस्थेंतर्गत नोंदीत सभासदांपैकी इमारत व इतर बांधकामाशी संबंधित कामगारांचे मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी ज्या संस्थेस प्राप्त कार्यरंभ आदेशातील काम पूर्ण करण्याचा कालावधी ९० |

| | | |
|---|---|---|
| | | दिवसापेक्षा जास्त असेल व अशा मजूर सहकारी संस्थांच्या सभासदांनी मागील वर्षात ९० दिवसापेक्षा जास्त दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र सदर संस्थेच्या अध्यक्षांनी निर्गमित केल्यास त्या सभासदांचे मंडळाकडे बांधकाम कामगारांना नोंदणी करण्यात यावी असे प्रस्तावित आहे.<br>सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मजूर सहकारी संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थेच्या अध्यक्ष/सचिवांनी सदर मजूर सोसायटीस प्राप्त झालेल्या इमारत व इतर बांधकामाच्या कार्यादेशानुसार सदर कामावर नेमलेल्या बांधकाम कामगाराने मागील एक वर्षात ९० दिवसापेक्षा जास्त दिवस काम केले असल्यास केलेल्या कामाच्या तपशिलासह ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र निर्गमित करावे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार आणि सेवाशर्ती नियमन) नियम २००७ च्या नियम ३३ मधील तरतूदीनुसार बांधकाम कामगाराची मंडळाकडे नोंदणी करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**<br>**विषय क्र.०२ :- श्री. सुभाष शांताराम सुराशे यांचा मा. कामगार उप आयुक्त, नाशिक कार्यालयात केलेला अर्ज** |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ अंतर्गत बांधकाम कामगार श्री.सुभाष शांताराम सुराशे (नोंदणी क्र. ०६०६००००४२३२) नोंदीत असून, बिल्डींगचे काम करत असताना टाईल्स कटींग मशीनचे ब्लेड अचानक तुटल्याने त्यांच्या मानेला गंभीर अपघात झालेला असल्याचे दि.०२.०६.२०१७ रोजीच्या अर्जात नमूद आहे.<br>सदर अर्जाचे अवलोकन केले असता, मेडीक्लेम बंद असल्याने मेडीक्लेत योजनेंतर्गत लाभार्थी कामगारांना खाजगी दवाखान्यात स्वखर्चाने उपचार करावे लागते व त्यापोटी त्यास रक्कम रू.३४०००/- इतका खर्च झालेला आहे. सदर कामगारास अपघातामुळे गळयाला झालेली रक्कम व शांतीपुष्प् ॲक्सीडेंट हॉस्पीटल, येवला नाशिक यांचे रक्कम रू.३४०००/- देयकाची प्रत पुरावा दाखल अर्जासोबत जोडलेली असून सदर अपघातामुळे उपचारार्थ झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने आर्थिक सहाय्य मिळणेसाठी विनंती केली आहे.<br>करीता, नोंदीत कामगार श्री. सुभाष शांताराम सुरासे यांनी झालेल्या अपघातासंबंधी मेडीक्लेम योजना बंद असल्याने मेडीक्लेम योजनेचा लाभ देणे शक्य झाले नाही व सदर प्रकरणी मंडळाने लागू केलेल्या विविध योजनेच्या माध्यमातून लाभार्थी कामगारास उपचारार्थ झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करून देणे शक्य नाही.<br>सार्वजनिक आरोग्य् विभागाची महात्मा फुले जन आरोग्य योजना दि.०२.०६.२०१७ पासून बांधकाम कामागरांकरीता लागू करण्यात आली आहे |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | सबब, मंडळाने जे बांधकाम कामगार मंडळात नोंदीत बांधकाम कामगारांना काम करतेवेळी अपघात झाल्यास व त्यास मंडळाने लागू केलेल्या योजनांच्या माध्यमातून लाभ देणे शक्य होत नाही. सदरचा प्राप्त निवेदन अर्ज मंडळाच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.<br>यावर मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांनी सदर प्रस्तावास विशेष बाब म्हणून नमुद करण्यात यावी, असे नमुद करून सहमती दर्शविली. तर कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी याआधी काही प्रस्ताव मंडळास देण्यात आले आहेत. त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.<br>सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगार श्री.सुभाष शांताराम सुराशे (नोंदणी क्र. ०६०६००००४२३२) नोंदीत असून, बिल्डींगचे काम करत असताना टाईल्स कटींग मशीनचे ब्लेड अचानक तुटल्याने त्यांच्या मानेला गंभीर अपघात झालेला असल्याने सदर अपघातामुळे झालेल्या जखमेवरील उपचाराचा खर्च रु. ३४,०००/- मंडळामार्फत देणेबाबत केलेल्या विनंतीनुसार विशेष बाब म्हणून श्री.सुभाष शांताराम सुराशे यांना ३४,०००/- एवढी रक्कम देण्यात यावी. सदर रक्कम थेट कामगाराच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत संबंधित जिल्हा कार्यालयास कळविण्यात यावे, असा** |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | |
|---|---|
| | **ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**<br><br>**विषय क्र.३: बांधकाम कामगारांचे कायद्यांतर्गत नोंदणीसाठी व लाभासाठीचे अर्ज (प्रस्ताव) नोंदणीकृत मजदूर संघटनेकडून दाखल करून घेण्याबाबत**<br><br>याबाबत मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना,लातूर यांचे निवेदन दि.२४.०३.२०१७ चे निवेदन पत्र मंडळात प्राप्त झाले होते. सदर पत्रात उक्त संघटनेने मंडळाच्या योजनांच्या लाभाचे अर्ज संघटनेकडून दाखल करण्याबाबत विनंती केलेली आहे. सदर पत्रासोबत उक्त संघटनेने मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.१८.०१.२०१० रोजीचे आदेश सोबत जोडण्यात आले आहेत. सदर आदेशात मंडळाच्या योजनांच्या लाभाचे अर्ज संघटनेकडून दाखल करण्याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत- **Registered trade unions, Legal service Authorities and NGOs are to be encouraged to assist the workers to submit applications for registration and for seeking benefits.**<br><br>मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता संघटनेच्या प्रतिनिधीकडून बांधकाम कामगारांच्या नोंदणी/ नुतनीकरण व लाभाचे वाटप इ. बाबत संघटनांनी खालीप्रमाणे सहाय्य करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | १. नोंदणी करीता विहीत नमुन्यात अर्ज तयार करणे.<br>२. नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे.<br>३. नोंदणी अर्ज जिल्हा कार्यालयांना सादर करणे.<br>४. नुतनीकरण करण्याकरीता परिपूर्ण अर्ज जिल्हा कार्यालयांना सादर करणे.<br>५. मंडळाच्या योजनेचे लाभ घेण्याकरीता विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे.<br>संघटनामार्फत प्राप्त नोंदणी अर्ज, नुतनीकरण अर्ज व लाभाचे अर्ज जिल्हा कार्यालयासप्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाची छाननी करून पात्र लाभार्थ्यांची समक्ष खात्री करूनच नोंदणी/ नुतनीकरण व लाभाचे वाटप करावे, जेणेकरून जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी होईल व लाभ वाटप होण्यास मदत होईल. तसेच, कामगार मंडळात नोंदीत झाल्यानंतर त्यास ओळखपत्राचे वाटप व मंडळाच्या योजनेत लाभ दिल्यानंतर अदा करावयाची लाभाची रक्कम समक्ष कामगारास देण्यात यावी असा प्रस्ताव राज्य शासनास दि.२९.०५.२०१७ सादर करण्यात आला होता.<br>उक्त प्रस्तावास शासनाने दि.१५.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिलेली असून त्याबाबतची कार्यकक्षा दिलेली आहे ती पुढीलप्रमाणे<br>राज्यातील नोंदणीकृत मजदूर संघटनांनी मदतनीस म्हणून सादर केलेले विहीत नमुन्यातील नोंदणी व |



(स्वाक्षरी)
**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | लाभाचे अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे जिल्हा कार्यालयाने स्विकारावे.<br>मदतनीस म्हणून राज्यातील नोंदणीकृत मजदूर संघटनेकडून आवश्यक त्या कागदपत्रासह प्राप्त झालेल्या अर्जाची सखोल छाननी करावी, छाननी नंतर पात्र ठरलेल्या कामगारांची भेटीची वेळ निश्चित करून समक्ष अधिकाऱ्याच्या समक्ष पडताळणीसाठी बोलविण्यात यावे. पडताळणीअंती सर्व बाबींची खात्री झाल्यावर बांधकाम कामगारांना ओळखपत्र वितरीत करण्यात यावे. नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी लाभाची मागणी केल्यास ते त्यास पात्र ठरल्यास त्यांचे देय आर्थिक लाभ DBT द्वारे त्यांच्या बँक खात्यात परस्पर जमा करण्यात यावेत.<br>सदर प्रस्तावास राज्य शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार पुढील कार्यवाहीकरीता सर्व क्षेत्रिय कार्यालयांना व त्यांच्यामार्फत नोंदणीकृत बांधकाम कामगार संघटनांना कळविण्यात येईल. शासनाची मान्यता व प्रस्तावित बाब मंडळाच्या माहितीस्तव सादर.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: बांधकाम कामगारांचे कायद्यांतर्गत नोंदणीसाठी व लाभासाठीचे अर्ज (प्रस्ताव) नोंदणीकृत मजदूर संघटनेकडून दाखल करून घेण्याबाबत मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या ठरावाला अनुसरून शासनाच्या दिंनाक १५.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्राप्त् झालेली आहे. सदर** |



अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

बाब मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात आली. मंडळाकडून सदर बाबीची नोंद घेण्यात आली.

**विषय क्र.४: पनवेल येथील कामगार कार्यालयात १ वर्षापासून नुतनीकरण करण्यासाठी प्रलंबित असलेल्या ७१० अर्जाचे नुतनीकरण त्वरीत करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, मा. श्री. श्रीपाद कुटासकर, सदस्य कामगार प्रतिनिधी यांचेमार्फत पनवेल कार्यालयात १ वर्षापासून नुतनीकरण करण्यासाठी प्रलंबित असलेल्या ७१० अर्जांचे नुतनीकरण करण्याबाबत पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रास अनुसरून मंडळाच्या पत्र क्र. काआ/इवइबाकाकमं/स.न.११/२०१७ दि.२६.०७.२०१७ च्या पत्रान्वये पनवेल येथील कामगार कार्यालयात प्रलंबित ७१० अर्जापैकी ज्या बांधकाम कामगारांचे नुतनीकरण करण्यासाठी ०१ वर्षे पूर्ण झाले असेल अशा बांधकाम कामगारांचे नुतनीकरण आपल्या स्तरावरून करण्यात यावे व ज्या बांधकाम कामगारांचे नुतनीकरण आपल्या स्तरावरून करणे शक्य नाही असे प्रस्ताव मुख्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

मंडळाच्या दि.२६.०७.२०१७ च्या अनुषंगाने कामगार उप आयुक्त, रायगड यांनी यांचे पत्र क्र.काउआ/रायगड/इवइबाकाम/२०१७/३१३२ दि.२१.०९.२०१७ अन्वये त्यांच्या कार्यालयाकडून अहवाल सादर केला आहे.

तसेच, नोंदीत बांधकाम कामगारांना हत्यारे व अवजारे खरेदी करीता दयावयाचे रू.५०००/-चे



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | अर्थसहाय्य वाटपाकरीता माहे मे २०१७ मध्ये मंडळामार्फत जिल्हा कार्यालयांना रू.११८ कोटी एवढी रक्कम वितरीत करण्यात आली असल्याचे स्पष्ट केले. तसेच त्याचा जिल्हानिहाय तपशिलाची यादी सर्व उपस्थितांना दिली. मंडळामार्फत वितरीत करण्यात आलेल्या निधीमधून जिल्हानिहाय वाटपाचा तपशील प्राप्त करण्यात येत आहे. असेही मंडळ सचिव यांनी स्पष्ट केले.<br>त्यावर मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी अजूनही ७१० अर्जदारांची नुतणीकरण करण्यात आले नसल्याचे सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच सदर कामगांरास कागदपत्रे अपूर्ण असल्याचे सांगण्यात येते. त्यावर मा. कामगार आयुक्त यांनी सदर ७१० कामगारांची यादी देण्यात यावी सदर कामगारांचे नुतणीकरण करून घेण्यात येईल, अशी ग्वाही मा. कामगार प्रतिनिधी कूटास्कर यांना मा. कामगार आयुक्त यांनी दिली.<br>सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी त्यांच्या पत्रात विचारणा केलेल्या पनवेल येथील कामगार कार्यालयात १ वर्षापासून नुतनीकरण करण्यासाठी प्रलंबित असलेल्या ७१० अर्जाचे नुतनीकरणाकरीता आवश्यक दस्तऐवज संबंधित लाभार्थ्यांना सादर करण्याबाबत लेखी सुचना देण्यात यावी व नुतणीकरणाकरीता आवश्यक बाबींची पुर्तता झाल्यावर सदर कामगारांचे नुतणीकरण** |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

करून घेण्यात यावे तसे कामगार उप आयुक्त पनवेल यांना कळविण्यात यावे. राज्यातील अन्य क्षेत्रिय कार्यालयाकडे नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाकरीता प्रलंबित प्रकरणांवर त्वरीत कार्यवाही करणेबाबत पुनश्च सुचना देण्यात याव्यात, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

**विषय क्र.५:मंडळाचे मा. अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) यांचे मानधनाचे दर वाढविणेबाबत.**

याबाबत मा. संचालक लेखा व कोषागारे श्री. नकवी यांनी मा. अध्यक्षांच्या मानधनाबाबत विचारणा केली असता मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाच्या दिंनाक २६.०८.२०१५ रोजीच्या बैठकीत कामगार आयुक्त यांनी मा. अध्यक्षांना आपले मानधन किती असावे अशी विचारणा केली असता, मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, मानधन हे सर्वानुमते ठरविण्यात यावे.

यावर श्री. कोळसे-पाटील, सह सचिव (कामगार) यांनी सांगितले की, इतर राज्यांतील मंडळाच्या अध्यक्षांना किती मानधन देण्यात येते हे तपासून त्याप्रमाणे मा. अध्यक्षांचे मानधन ठरविण्यात यावे असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

तसेच दिनांक ०२.११.२०१५ रोजीच्या मंडळ बैठकीत शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक शासाउ १०.१०/ प्र क्र ९६/ सा.उ., दि. १३.०३.२०१२ च्या जोडपत्र -१ मधील राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या अध्यक्षांना

अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | देय सोयी सुविधांचे मानधन रु.७५००/- नमूद आहे. तथापि, ते फार कमी असल्याचे मा. कामगार आयुक्त यांनी नमुद केले होते. त्यावर श्री.भुताड, कामगार प्रतिनिधी यांनी यामध्ये १०% वाढ करावी, असे सुचविले. यावर सविस्तर चर्चा होऊन अंतिमत: मा. कामगार आयुक्त यांनी मा.अध्यक्षांचे मानधन एकत्रितपणे रु.२५,०००/- असावे असे मत मांडले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली. त्यानुसार मंडळाच्या मा. अध्यक्षांना रु.२५,०००/- मानधन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात येईल असे मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले.<br>त्यानुसार दिनांक ०९.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. अध्यक्ष यांना रु. २५,०००/- मानधन देण्याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले. त्या अनुषंगाने उद्योग ऊर्जा व कामगार विभागाचे क्र. इबाका २०१५ /पं.क्र.३१७/ कामगार- ७ दिनांक ०३.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये वित्त विभाग शासन निर्णय क्र. शासाऊ-१०.१०/प्र.क्र.१६/१०/सा.उ. दिंनाक १३.०३.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या अंशकालीन अध्यक्षांना रु. ७५००/- इतके मानधन अनुज्ञेय आहे. याशिवाय त्यांना बैठक भत्ता, निवासी दुरध्वनीवरील खर्चाची प्रतिपूर्ती, वाहन सुविधेवरील खर्च, निवास, प्रवास भत्ता, निवासी दुरध्वनीवरील खर्चाची प्रतिपुर्ती, वाहन सुविधेवरील खर्च, निवास, प्रवास भत्ता इ. सोयी-सुविधा अनुज्ञेय आहे, असे कळविण्यात आले आहे. |

अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| | परंतू दिनांक १५.०६.२०१६ रोजी मंडळाचे मा. अध्यक्ष यांना राज्यमंत्री दर्जा प्राप्त झाला आहे. त्यानुसार मंडळाचे मा. अध्यक्ष यांना मानधन ठरविण्यात यावे, असेही मा. कामगार आयुक्त यांनी प्रस्तावित केले.<br>मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, नगरविकास विभागाने महानगरपालिकेच्या वर्गीकरणानुसार महानगरपालिकेच्या सदस्यांचे मानधन शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१५/प्र.क्र.१२८/नवि-२० दिनांक १५.०७.२०१७ अन्वये निश्चत केले आहेत. त्यानुसार "अ+ वर्ग" गटातील सदस्यांचे मानधन रु. २५,०००/-, "अ वर्ग" गटातील सदस्यांचे मानधन रु. २०,०००/-, "ब वर्ग" गटातील सदस्यांचे मानधन रु. १५,०००/- व "क व ड वर्ग" गटातील सदस्यांचे मानधन रु. १०,०००/- असे आहे.<br>यावर मा. संचालक लेखा व कोषागारे श्री. नकवी यांनी सदर शासन निर्णयाचा संदर्भ देवून तसेच मंडळाचे मा. अध्यक्ष यांना शासनाने शासन निर्णय क्र. क्र.किवेअ-१०१५/प्र.क्र.१८३/कामगार-७ दिनांक ०२.०५.२०१६ अन्वये राज्यमंत्री दर्जा प्रदान केलेला आहे. त्यानुसार मा. अध्यक्षांच्या मानधन वाढीबाबत पुनश्च शासनास विनंती करण्यात यावी, असे सादर केले.<br>सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळाचे मा. अध्यक्ष यांना शासनाने दिंनाक ०२.०५.२०१६ अन्वये राज्यमंत्री दर्जा प्रदान केलेला आहे. तसेच नगरविकास विभागाने महानगरपालिका सदस्यांच्या मानधनात शासन निर्णय** |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

दिनांक १५.०७.२०१७ अन्वये वाढ केलेली आहे. महापालिका सदस्यांच्या मानधनातील वाढ विचारात घेऊन त्या आधारे मंडळाच्या मा. अध्यक्षांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव फेरविचारार्थ शासनास सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

**विषय क्र.६: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांकरीता दरमहा आवश्यक धान्यादी मालाचे नुर्टीशनल किट पुरवठा करणेबाबत.**

मंडळामार्फत नोंदित बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविण्याचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेअंती शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रसतावास शासन स्तररावरुन दिनांक १२.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्राप्त् झाली आहे. शासन मान्यतेनुसार सदर योजना राबविण्यासाठी संस्था निश्चित करण्यासाठी RFP Document तयार करून आजच्या बैठकीत सादरीकरण करण्यात आलेले आहे. मंडळाच्या मान्यतेअंती सदर RFP Document ला शासन मान्यता प्राप्त करून ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करणे प्रस्तावित आहे. तथापि, नोंदित बांधकाम कामगाराकरीता दरमहा आवश्यक धान्यादी मालाचे नुर्टीशनल किट पुरवठ्याकरीता मे. इटॉस ट्रेडींग प्रा. लि. यांनी योजनेचे सादरीकरण करण्यासाठी परवानगी मिळावी अशी विनंती केली.

त्यास अनुसरून मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी सुचित केले की, संबंधित संस्थेस सादरीकरण करण्यास



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | पवानगी देण्यात यावी. त्यानुसार मंडळातील नोंदित बांधकाम कामगाराकरीता दरमहा आवश्यक धान्यादी मालाचे नुर्टीशनल किट पुरवठ्याबाबत मे. इटॉस ट्रेडींग प्रा. लि. यांनी प्रस्तावाचे सादरीकरण केले. सदर सादरीकरणातील मुद्दे खालीलप्रमाणे:<br>१. नोंदित बांधकाम कामगारांना मासिक धान्यादी मालाचे नुर्टीशनल किट पुरवठा करणे.<br>२. मासिक धान्यादी मालाचा पुरवठा निश्चित करताना बांधकाम कामगारांच्या कामाच्या स्वरुपानुसार आवश्यक कॅलरीज् विचारात घेणे.<br>३. बांधकाम कामगारांच्या दैनिक गरजेनुसार धान्य, डाळी, दुध पावडर, तेल, मसाला, इत्यादी मालाचे परिमाण निश्चित करून नुर्टीशनल किट मध्ये समाविष्ट करणे.<br>४. नुर्टीशनल किट पुरवठयाकरीता ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करणे.<br>५. नुर्टीशनल किट वाटपाकरीता ठिकठिकाणी सुविधा उपलब्ध करून देणे.<br>६. बांधकाम कामगारांना किट खरेदीसाठी बँकेकडून लेबर कार्ड उपलब्ध करून देणे व सदर कार्ड Swap करून नुर्टीशनल किट बांधकाम कामगारांना उपलब्ध करून देणे.<br>७. बांधकाम कामगारांना देण्यात आलेल्या लेबर कार्ड मधील रक्कम मंडळामार्फत् दरमहा Top Up करणे.<br>८. मंडळामार्फत बांधकाम कामगारांना द्यावयाच्या नुर्टीशनल किट मधील धान्यादी माल व परिमाण आहार |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | तज्ञांच्या सल्ल्याने निश्चित करणे.<br>सादरीकरणनंतर मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी सुचित केले की, मंडळाने सदर योजनेस तत्वत: मान्यता द्यावी, मध्यान्ह भोजन योजना व धान्यादी मालाचे नुर्टीशनल किट पुरवठा या दोन्ही योजनेचे प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावे. शासन स्तरावरुन दोन्ही योजनांपैकी कोणती योजना नोंदित बांधकाम कामगारांना लागू करावयाची याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.<br>सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांकरीता दरमहा नुर्टीशनल किट पुरवठा करण्यासाठीच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. मध्यान्ह भोजन योजना व धान्यादी मालाचे नुर्टीशनल किट पुरवठा योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.** |

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहिर केले.

******************

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**